खासगी बैठक.

## दक्षिणी संस्थान प्रजापरिषद्.

ता. २४।२५ माहे मे १९२१.

# त्रोटक अहवाल.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९२१.

किंमत २ आणे.

# कार्यकारी मंडळ.
## १९२१–१९२२.

अध्यक्षः—रावसाहेब शंकर भालचंद्र बापट B. A पेनशनर ( होळकर आळी, सदाशिव, पेठ पुणें ).

उपाध्यक्षः—रा. रा. केशव रामचंद्र खाडिलकर M. A. LL. B. वकील (सांगली).

सेक्रेटरीः—१ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर B. A. LL. B. संपादक केसरी ( केसरी ऑफिस, पुणें).

२ रा. रा. अनंत विनायक पटवर्धन B. A. मेंबर सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ( किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें ).

सभासद—१ प्रो. के. रा. कानिटकर M. A., B. sc. (फर्ग्युसन कॉलेज, पुणें).

२ रा. ल. ब. भोपटकर M. A., LL. B. वकील (सदाशिव पेठ, पुणें)

३ ,, ल. ज. आपटे B. A. LL. B. वकील (सदाशिव पेठ, पुणें).

४ ,, ग. र. अभ्यंकर B. A., LL. B. वकील ( सांगली ).

५ ,, गो. म. रानडे, वकील ( मिरज ).

६ ,, वा. य. वाटवे B. A., LL. B. वकील ( जमखंडी ).

७ ,, बलभीम मल्लिकार्जुन पाटणे (खंडाळी, सं. मिरजमळा ).

८ ,, धोंडो अमृत शेट्ये ( भोर ).

९ ,, त्रिंबक रामचंद्र चमचे ( फलटण ).

१० ,, विष्णु बाबा अक्कलकोटकर, सं. अक्कलकोट. ( ज्ञानकोश आफिस, शनवार पेठ, पुणें ).

११ ,, पं. आ. इनामदार M. A., B. SC. ( औंध ).

१२ ,, हणमंत कृष्ण वालगांवकर सावकार व वकील (जत ).

१३ ,, गं. आ. दिमोटे वकील ( जव्हार ).

१४ ,, गजानन भिकाजी वैद्य ( श्रीवर्धन, सं. जंजिरा ).

१५ डॉ. गोपाळराव पळसुले ( आनंदाश्रम, पुणें ).

१६ रा. वा. रा. कोठारी B. A. संपादक जागरूक ( जागरूक ऑफिस, कसबा पेठ, पुणें ).

१७ ,, वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी B. A., LL. B. वकील सं. कोल्हापूर. ( कसबा पेठ पुणें. )

१८ ,, ग. शं. गोखले, संपादक विद्याविलास ( कोल्हापूर ).

१९ ,, म. चिं. जोग वकील ( इचलकरंजी ).

२० ,, मोरो बळवंत मराठे B. A. LL. B. वकील ( सं. कुरुंदवाड) ( बेळगांव )

रा. रा. अनंत विनायक पटवर्धन सेक्रेटरी यांनींच तूर्त खजिनदाराचेंही काम करावें असें ठरलें आहे.

# दाक्षिणी संस्थान प्रजापरिषद.

## खासगी बैठक.

ता. २४।२५ माहे मे १९२१

## प्रास्ताविक दोन शब्द.

हिंदुस्थानचा नकाशा हातांत घेऊन त्याकडे पहातां त्यावर तांबडा व पिंवळा रंगच सर्वत्र दिसतो. हे रंग काय दाखवि-तात हें नकाशावरील स्पष्टीकरणावरून पाहिलें किंवा तांबडा व पिंवळा रंग कशाचे निदर्शक आहेत याचा व्यावहारिक अनुभव पाहिला तरी तात्पर्य एकच निघतें. तांबडाबुंद रंग मनुष्याची ताकद दाख-वितो व पिंवळटपणा हा त्याच्या रोगिष्टपणाचें स्पष्ट चिन्ह असतें. नकाशा-वरील तांबडा रंग वरिष्ठ सत्ताधारी ब्रिटिश अंमल दाखवितो व पिंवळा रंग फासलेला प्रदेश, हीनबल संस्थानी अंमल दाखवितो. या तांबड्या पिंवळ्या रंगांनीं निदर्शित क्षेत्रमर्यादा एकमेकांत गुंतागुंत झालेल्याही आहेत. तांबड्या रंगानें निदर्शित होणारा, प्रदेश, लोकसमाज किंवा राज्यपद्धति राकट व प्रागतिक आहेत व पिंवळ्या रंगानें ज्ञात होणारा, मुलूख, प्रजासंघ किंवा राज्यकारभार पंगु आहेत. हे दोन्ही परस्परांच्या सान्नि-ध्यानें न जोरावतां हीनबलच होतात. ब्रिटिश मुलुखांत पाश्चात्य संस्कृती-खालीं तयार झालेली नोकरशाही, संस्थानी मुलुखांतील वैयक्तिक राज्यपद्धती-च्या सांनिध्यानें आपलें पूर्वशिक्षण विसरून जाऊन ‘ काळ्याजवळ बांधला पोंवळा रंग नाहीं पण गुण तरी लागला ’ अशी बनते. संस्थानामध्यें एका काळीं अत्युत्कट स्थितींत असलेली वैयक्तिक भक्ति खालसाच्या संसर्गानें हीन-तेज झाली आहे. हिंदी संस्कृतीनें ‘आराधनाय लोकाना मुंचतो नास्ति मे व्यथा’ अशी मनोभूमिका तयार झालेला आमचा भूपालवर्ग, खालसांतील नोकर-शाहीच्या संसर्गानें, शिक्षणानें, संस्थानांतून नामशेष होत चालला आहे,

तिकडे नोकरीपेशामुळें प्रजाजनावर पितृतुल्य प्रेम करण्याचें केव्हांच शिक्षण न मिळालेला नोकरशाहींतील नोकरवर्ग, राजेरजवाड्यांच्या एकतंत्री राजसत्तेच्या उदाहरणानें तेव्हांच 'अरेराव' बनत आहे. या अशा परस्परविरोधी संस्कृतींच्या सान्निध्यानें अधिकारापन्न असलेल्या व्यक्ती, मनुष्यस्वभावानुरूप परस्परांचे गुण घेण्याचे ऐवजीं दुसऱ्याचे अवगुण तेवढे चटकन उचलून घेऊन दोन्ही संस्कृतीच्या अवगुणांनीं पूर्णपणें मंडित अशा मूर्ती बनतात. खालसा मुलुखांत या मूर्तींचें अधिष्ठान स्थान, काल, वय यांनीं मर्यादित असल्यानें तेथील अधिकारापन्न व्यक्तींच्यामध्यें बदल होतो व व्यक्तिभेदानें राज्यपद्धतींत बदल होतो. संस्थानांत ही परिस्थिति नाहीं; त्यामुळें त्या पद्धतींत बदल होण्याचा संभव फार थोडा असतो. एखाद्या शेतांत पिकाचा पालट न झाल्यास निसर्गत: येणाऱ्या पिकाचें मान कमी होतें, आणि पीक हीनजात बनतें. तीच स्थिति संस्थानांतील गादीनशीन घराण्यांतील व्यक्तींची होते. वैयक्तिक राज्यपद्धतीच्या वातावरणांत जन्मास आलेले, त्यांत वाढलेले राजेयुवराजे, यांच्या मनोभूमिका योग्य विचारांच्या निपजेस अपात्र झाल्यास हा त्या व्यक्तींचा दोष नाहीं. या हीनतेज झालेल्या व्यक्तींवर ब्रिटिश राजछत्राची संरक्षक सावली सारखी पडत गेल्यानें संस्थानांतील राज्यपद्धति सदोष बनणें साहजिकच आहे. ब्रिटिश सरकारच्या अपरिमित सामर्थ्याचा संरक्षक पाठिंबा आपल्यास आहे अशी पक्की खात्री संस्थानिक व संस्थानी अधिकारी यांची असल्यानें, त्यांस लोकमताची चाड किंवा भीति रहाण्याचें कारणच नाहीं. संस्थानी मुलुखाचे संस्थानिक मालक आहेत, तेच ⅓ हिंदुस्थानाचे स्वयं-स्थापित प्रतिनिधी आहेत, या प्रदेशांतील मनुष्यप्राण्यांना स्वतंत्र आत्मा नाहीं हीच विचारसरणी लावण्यांत आल्यानें हिंदुस्थानांतील ⅓ भागांतील लोक कर्तव्यज्ञाननष्ट असणें साहजिक आहे. अशा कर्तव्यमूढ समाजाचें लोढणें कितीही द्रुतगतीच्या अन्य समाजाच्या गळ्यांत बांधलें तर त्याची गति स्वाभाविकपणें कुंठित होणार. यासंबंधानें विशेष खेदाची गोष्ट ही आहे कीं, या दोन्ही प्रदेशांत रहाणाऱ्या समाजांच्या धुरीणांना या स्थितीची अंधुकही जाणीव नाहीं. त्यांस या दोन्ही भागांच्या पडलेल्या सांगडीची जाणीव न होतां ते आपापले जागीं आपण एकेकटेच दुसऱ्याच्या सहकार्याशिवाय द्रुतगति प्रगति करूं असें कसें मानतात व त्यास दुसरा भाग आपल्या मार्गांत केवढी मोठी धोंड

साहजिकपणें बनतो याबद्दल त्यांना इतकें गाढ अज्ञान कसें असतें, याची कल्पना होत नाहीं. ही स्थिति आजमितीलाही आहे. एका नाहीं अनेक कारणांच्या समुच्चयानें खालसा मुलुखांतील परिस्थितींत पालट झाला आहे. तरी तेथील पुढारी म्हणविणाऱ्या लोकांचें या बाबतींतील अज्ञान कल्पनातीत आहे. खालसा व संस्थानी मुलुखांतील प्रदेश अलग असते तर हें अज्ञान एक वेळ क्षम्य झालें असतें. परंतु खालसा व संस्थानी मुलूख तसे अलग नाहींत. दोघांना एकाच ठिकाणीं जावयाचें असल्यास पाय गाळणाऱ्या आपल्या सोबत्याच्या खाकेंत हात घालून त्याला बरोबर ओढून नेल्यावांचून आपला पल्ला आपल्यास गांठतां येणार नाहीं, हें खालसांतील पुढाऱ्यांनीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. एकमेकांच्या मदतीनें पल्ला गांठावयाच्या निश्चयानें निघालेल्या प्रवाशांपैकीं कमजोर इसम दुसऱ्याच्या पुरस्कारानें मजल दर मजल जाऊं शकतो. ही स्थिति खालसा व संस्थानी मुलुखांतील प्रजेच्या प्रगतीची आहे. संस्थानांतील प्रमुख लोक व खालसांतील संस्थानी प्रश्नांबद्दल आस्था असणारी मित्रमंडळी यांच्या सहकार्यानें प्रस्तुतच्या परिषदेच्या बैठकीचा उपक्रम झाल्यानें संस्थानी राज्यव्यवस्थेस प्रागतिक स्वरूप मिळण्याचें इच्छित कार्य साध्य होण्यास सुलभता येणार आहे व हा योग जुळून आला ही आनंदाची गोष्ट आहे. यंदांच्या परिषदेचें अधिवेशन निर्विघ्नपणें पार पडून त्याचा त्रोटक अहवाल सादर करण्याची संधि प्राप्त झाली ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.

या परिषदेच्या बैठकींत, सतत काम चालूं ठेवण्याकरतां एका संस्थेची स्थापना झाली व तिची घटना व नियम मंजूर होऊन तिच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली ही तर विशेष आनंदाची गोष्ट आहे. कोणत्याही कार्यास पैशाची मदत अत्यंत अवश्यक असते, व त्या बाबतींतही मंडळीकडून आशाजनक अशी मदत मिळाली हीं प्रसादचिन्हेंच आहेत. अशा परिषदेस तिच्या कामाच्या महत्त्वाच्या मानानें लायख अध्यक्ष मिळण्याची एक मोठी अडचण कार्यकारी माणसांच्या वाटेंत असते. परंतु मूक प्रजाजनांच्या हिताचे कार्याचा हा आरंभ असल्यानें ही अडचण निवारण होणें साहजिकच होतें. जमखंडी व फलटण या दोन संस्थानांत उत्तम तऱ्हेनें कारभार केल्याबद्दल लौकिक असलेले, रावसा. शंकर भालचंद्र बापट बी. ए.

पेनशनर यांस विनंति करतांच नव्या कार्याचा हा उपक्रम आहे ही गोष्ट जाणून, अवधि फार नव्हता तरी, त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें. रावसा. बापट यांनीं अध्यक्षाचें म्हणजे मार्गदर्शकाचें काम किती उत्तम तऱ्हेनें केलें हें परिषदेमध्यें पास झालेल्या ठरावांवरून सहजच कळून येणार आहे. यंदांच्या परिषदेंत संस्थानांतील अंतर्गत राजव्यवस्थेची चर्चा करावयाची नाहीं व परिषदेचें काम खासगी बैठकीच्या स्वरूपाचें ठेवावयाचें असें ठरविल्यानें कामास सुलभता पुष्कळच आली. या परिषदेच्या बैठकीस संस्थानिकांच्या प्रतिनिधींस आमंत्रण करावें अशा एक सूचना होती परंतु ती यंदां व्यवहार्य वाटली नाहीं. यापुढील परिषदेच्या अधिवेशनाची जबाबदारी घेण्यास योग्य अशा कार्यकारी मंडळाची नेमणूक झाली आहे. पहिल्या बैठकीच्या वेळीं जितक्या अडचणी कमी उत्पन्न होतील तशी योजना करणें भाग पडलें होतें. परिषदेचें पहिलें अधिवेशन होऊन संस्थानी प्रजेच्या हितानहिताच्या प्रश्नांच्या चर्चेस योग्य तें वळण देणारें जबाबदार मंडळ स्थापन झाल्यानें अंगीकृत कार्याच्या जबाबदारींतून सुटका चांगल्या प्रकारें झाल्याचें समाधान वाटत आहे. शेवटीं ज्या मंडळींनीं हें कार्य पार पाडण्यास हरएक तऱ्हेनें मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानून पुढील बैठक याहीपेक्षां जास्त चांगल्या तऱ्हेनें होईल अशी आशा प्रगट करून हे प्रास्ताविक शब्द पुरे करतों.

नरसिंह चिंतामण केळकर,
अनंत विनायक पटवर्धन,
व्यवस्थापक द. सं. प्र. परिषद.

---

# दक्षिणी संस्थान प्रजापरिषद.

## खासगी बैठक.

### त्रोटक अहवाल.

ता. २४।२५ माहे मे १९२१.

दक्षिणेंतील संस्थानांपैकीं निमंत्रित गृहस्थ व खालसा मुलुखांतील संस्थानांबद्दल आस्था बाळगणारे गृहस्थ यांची परिषद ता. २४ माहे मे सन १९२१ मंगळवार रोजीं सकाळीं ८ वाजतां रा. नरसिंह चिंतामण केळकर, संपादक केसरी व रा. अनंत विनायक पटवर्धन, मेंबर सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटी यांच्या निमंत्रणावरून बोलावण्यांत आली होती. या परिषदेच्या कामास पुणें येथें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत ता. २४ मे १९२१ रोजीं सकाळीं आठ वाजतां सुरुवात झाली. या परिषदेस येण्याबद्दल पाठविलेल्या चारशें निमंत्रणांपैकीं निमंत्रणाचा स्वीकार करून २५० वर मंडळी परिषदेस पुणें व निरनिराळ्या बाहेरील ठिकाणांहून आली होती. (दोन निमंत्रणपत्रिका व पत्रिकेबरोबर पाठविलेल्या प्रश्नांची यादी इतर लोकांकडून आलेल्या सूचना परिशिष्ट अ मध्यें दिली आहे.)

निमंत्रितांपैकीं परगांवची १५०।१७५ वर मंडळी हजर होती व पुण्यामध्यें साधारणतः रहाणारे परंतु संस्थानच्या हितानहिताबद्दल आस्था असणारे ७५ वर गृहस्थ परिषदेंत हजर होते. कोल्हापूर, सांगली, मिरज, मिरजमळा, जमखंडी, कुरुंदवाड, इचलकरंजी, जत, फलटण, भोर, औंध, अक्कलकोट, जंजिरा, जव्हार वगैरे संस्थानांतील मंडळी परिषदेस हजर होती. परिषदेच्या तिन्ही बैठकीच्या वेळीं हजर असलेल्या मंडळींत पुढील प्रमुख गृहस्थ होते. रावसाहेब शंकर भालचंद्र बापट ( पुणें ), रा. रामभाऊ साने ( बार्शी ), प्रो. के. रा. कानिटकर ( पुणें ), रा. रा. वा. रा. कोठारी ( पुणें ), रा. ग. र. अभ्यंकर ( सांगली ), रा. एस. वायू. अभ्यंकर (कोल्हा-

पूर ), रा. कृ. गो. करकरे ( जव्हार ), रा. वा. बा. कुळकर्णी (कोल्हापूर), रा. व्यं. बा. केतकर ( रामदुर्ग ), रा. पांडुरंग वासुदेव गाडगीळ ( कुरुंदवाड ), रा. देवचंद नानचंद गुजर ( मोडनिंब, सं. मिरज ), रा. ज. र. घारपुरे ( मुंबई ), रा. सखाराम परशराम घैसास ( जंजिरा ), रा. त्रिं. बा. चमचे ( फलटण ), रा. तमण्णापा चिकोडी ( बनहट्टी, सं. जमखंडी ), रा. केशवराव छापखाने ( सांगली ), रा. विनायकराव जोग ( पंढरपूर ), रा. जी. जी. ठकार ( पुणें ), प्रि. गोविंद चि. भाटे ( सांगली ), रा. वा. रा. गुप्ते ( पुणें ), रा. य. अ. ठोंबरे ( पुणें ), रावब. एम्. जी. डोंगरे ( कोल्हापूर, पुणें ), रा. श्री. मा. ढाणी ( फलटण ), रा. सी. के. दामले ( पुणें ), रा. ग. आ. दिमोटे ( जव्हार ), रा. के. रा. दिवेकर ( भोर ), रा. बळवंत शहाजीराव देशमुख ( भोर ), डॉ. देसाई ( सांगली ), डॉ. नाईक ( पुणें ), रा. द. ग. पटवर्धन ( भोर ), रा. एन्. एम्. पटवर्धन ( मोडनिंब, सं. मिरज ), रा. एस्. जी. पटवर्धन ( औंध ), रा. पं. आ. इनामदार ( औंध ), रा. बलभीम मल्लिकार्जुन पाटणे ( खंडाळी–सं. मिरज मळा ) रा. ता. ने. पांगळ (पुणें), रा. भा. या. पेणसे ( श्रीवर्धन, सं. जंजिरा ), रा. पु. के. फडके ( जमखंडी ), रा. वि. म. फडके ( कुंदगोळ, सं. जमखंडी ), रा. भा. ब. म्हाबळ ( जमखंडी ), रा. वा. य. बाटेव (जमखंडी), रा. शं. अ. आपटे (जम खंडी) रा. फाटक ( भोर ), रा. महादेव राजाराम बोडस ( मुंबई ), रा. गणपतराव पागे ( मंगळवेढे, सं. सांगली ), रा. भिडे ( पाली, सं. भोर ), रा. मंगसुळी ( शिरहट्टी, सं. सांगली ), रा. मोरोपंत मराठे ( अनगोळ-बेळगांव ), रा. अश्वत्थराव महिषि ( शिरहट्टी, सं. सांगली ), रा. विनायकराव माईणकर (सांगली ), रा. माणिकचंद गंगाराम ( फलटण ), रा. गोविंदराव रानडे ( मिरज ), प्रो. विजापूरकर ( कोल्हापूर-तळेगांवदाभाडे ), रा. केशवराव वकील ( निजाम हैद्राबाद ), रा. के. एस्. वैद्य ( निजाम हैद्राबाद ), रा. वर्तक ( भोर ), रा. शहा (फलटण), रा. वालचंद नानचंद शहा (मोडनिंब, सं. मिरज ), रा. बापुसाहेब साठे ( मोडनिंब, सं. मिरज ), रा. धोंडो अमृतराव शेटे ( भोर ), रा. मुकुंद जीवन सख्ये ( जव्हार ), मि. महमद इब्राहिम हौदी ( श्रीवर्धन, जंजिरा. ).

## स्वागतपर भाषण.

प्रारंभीं परिषद् भरविण्याचा उपक्रम करणाऱ्या दोघां व्यवस्थापकांपैकीं रा.न.चिं. केळकर यांनीं प्रास्ताविक भाषण करून जमलेल्या मंडळींचें स्वागत केलें. ते म्हणाले कीं, "दक्षिणेंत अशा प्रकारची भरलेली ही पहिलीच परिषद असेल असें मला वाटतें. सार्वजनिक सभेच्या या जागेंत असा कांहीं संस्थानच्या प्रजेच्या हितानहिताचा विचार करण्याचा उपक्रम पूर्वीं केव्हां झाला असल्यास तो मला माहीत नाहीं. कदाचित् रा. रामभाऊ साने यांच्यासारखीं जुनीं माहीतगार माणसें तें सांगूं शकतील. काठेवाडच्या लोकांनीं आमच्या आधीं अशा प्रकारची परिषद् नुकतीच भरविली हें आपणास माहीत आहेच. आजची ही सभा पाहून मला राष्ट्रीय सभेच्या जन्माची आठवण होते. राष्ट्रीय सभेच्या उपक्रमाचा विचार या सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत च झालेला आहे. त्यावेळीं पुण्यांत महामारीचा विकार सुरू झाल्यानें राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन मुंबईस झालें. ती अडचण न येती तर या दिवाणखान्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें असतें, निदान तिच्या अधिवेशनाची पूर्वतयारी तरी येथें झाली असती. राष्ट्रीय सभेचा उगमही प्रस्तुत परिषदेप्रमाणेंच, अल्प प्रमाणांत झाला होता. राष्ट्रीय सभा राजनिष्ठ होती तशीच आजची ही परिषदही संस्थानिकांशीं राजनिष्ठच आहे. किंबहुना राष्ट्रीयसभेपेक्षां ही अधिक राजनिष्ठ आहे. कारण ब्रिटिश सरकाराविषयीं राष्ट्रीयसभेला परकीपणा वाटत असे, पण या परिषदेला आपल्या संस्थानिकांविषयीं पूर्ण आपलेपणा वाटत आहे. संस्थानांच्या कारभारावर आपण प्रसंगविशेषीं कडक टीका करितों तरी पण त्यांचेबद्दल आम्हांला पूर्ण प्रेम व आपलेपणा वाटतो हें तोंडानें सांगण्याची जरूरी नाहीं. संस्थानांत आपणाला सध्यांच रुपयापैकीं आठ आणे स्वराज्य आहे; म्हणजे तेथें आपल्या लोकांचे हातीं राज्यकारभारच्या सर्व वरिष्ठ जागा आहेत व राहिलेले आठ आणे स्वराज्य म्हणजे या राज्यकारभारावर लोकप्रतिनिधींचा ताबा तो आपणास मिळवावयाचा आहे. संस्थानिकांनीं आपला राज्यकारभार प्रजेच्या तंत्रानेंच चालवावा हें योग्य आहे. ब्रिटिश सरकारालाही हीच गोष्ट संमत दिसते. ब्रिटिश हद्दींतल्याबरोबरच देशी संस्थानांतही सुधारणा झाल्या पाहिजेत असें मॉटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टांत सौम्य भाषेंत पण पूर्ण निश्चयानें सांगितलें आहे.

"संस्थानिकांच्या अडचणीही आम्ही जाणून आहोंत. कित्येक संस्थानें अल्पप्रमाण आहेत; कांहींचे मुलूख तुटक आहेत व कांहींचें उत्पन्नही फार थोडें आहे. हें सर्व कबूल आहे. पण त्यांनीं मनांत आणल्यास त्यांना प्रजेला कांहीं सामान्य स्वातंत्र्याचे अधिकार देतां येतील. लहान संस्थानांच्या संस्थानिकांस जर फांशी देण्याचे फौजदारी न्यायाचे अधिकार व दिवाणीचे हायकोर्टाचे मोठाले अधिकार गाजवितां येतात तर मग त्यांनीं प्रजेला अधिकार देण्यास हरकत काय आहे? लहान संस्थानें म्हणून थर्ड क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार घेऊन त्यांचे संस्थानिक रहातात काय? जुलूम होण्याची शक्यता जेथें असते तेथेंच स्वातंत्र्य देण्याची अवश्यकताही उत्पन्न होते. संस्थानी प्रजा आजपर्यंत बहिरी मुकी असे, पण तिला आज वाचा फुटत आहे, तिचा बहिरेमुकेपणा आज जाणार या दृष्टीनें आजचा हा प्रसंग अभिनंदनीय होय. ही परिषद् घडवून आणण्याचा खरा उद्योग माझे मित्र रा. वामनराव पटवर्धन यांनीं केला आहे. त्यांचा स्वतःचा संस्थानशीं अद्यापही निकट संबंध आहे. ही परिषद् भरविण्यास त्यांचेच परिश्रम मुख्यतः कारणीभूत झाले आहेत व मी केवळ निमित्तमात्र आहें हें सांगणें मला अवश्य वाटतें. आपण सर्व मंडळी आमच्या दोघांच्या वैयक्तिक विनंतीस मान देऊन मोठ्या कार्याचा उपक्रम करण्यास काल व पैसा यांची झीज सोसून आलां यावरून आपणांस या कार्याचें किती महत्त्व वाटत आहे याची जाणीव पटणार आहे. आपल्या स्वागताची आम्हीं कांहींच व्यवस्था केलेली नाहीं सबब या माझ्या भाषणास स्वागतपर भाषण असें नांव देण्यास आम्हांस मुळींच अधिकार नाहीं. सबब आपण घेतलेल्या तसदीबद्दल आपले आभार मानून मी माझें प्रास्तविक भाषण पुरें करतों. आतां आपण आजच्या परिषदेच्या कामाचा कर्णधार योजण्याचे कामास सुरुवात करावी अशी विनंति आहे."

## अध्यक्षांची निवडणूक.

रा. रा. नरसोपंत केळकर यांचें वरील आशयाचें भाषण झाल्यावर या परिषदेचें अध्यक्षस्थान रावसाहेब शंकरराव बापट, माजी कारभारी फलटण व जमखंडी, यांनीं स्वीकारावें अशी सूचना प्रो. के. रा. कानिटकर, फर्ग्युसन कॉलेज, यांनीं पुढें

मांडली. सदर सूचना पुढें मांडतांना प्रो. कानिटकर म्हणाले, "रावसाहेब बापट यांनीं संस्थानांत पंधरा वीस वर्षे कारभाऱ्यासारखें जबाबदारीचें काम चांगल्या रीतीनें पार पाडल्यामुळें ते या जागेस अगदीं लायख आहेत. सर्व संस्थानें एकदम खालसा व्हावींत अशीही उद्गार लोकांच्या तोंडून उद्वेगानें कधीं कधीं निघत असतात पण ते रागाचे शब्द असतात. वस्तुतः आपलेपणाची दृष्टि त्यांचेबद्दलची तुटत नाहीं. संस्थानी राज्यकारभाराच्या सुधारणेचा प्रश्न फार गुंतागुंतीचा असून तो सौम्य हातानेंच सोडविला पाहिजे. या परिषदेमुळें संस्थानिकांचा कदाचित् गैरसमज होईल व खालसा मुलखांत राजकीय सुधारणा झाल्या नसत्या तरी बरें झालें असतें असेंही कदाचित् एखाद्या संस्थानिकास वाटेल. परंतु हा गैरसमज दूर होणें जरूर आहे. खुद्द संस्थानिकांचीही कित्येक बाबतींत फार कष्टमय स्थिति आहे व ती आमच्या या प्रयत्नांमुळें सुधारण्यास मदतच होईल. नरेंद्रमंडळासारख्या संस्था अशा परिषदांनीं विशेष कार्यक्षम होतील. एतद्देशीय संस्थानिकांनाच आमच्यासंबंधांत 'फारेन' म्हणजे 'परकी' असें ब्रिटिश कायद्याचे भाषेंत म्हणण्यांत येतें ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. ही अनिष्ट स्थिति दूर करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत अवश्य आहे.

सदर कार्य आजच्यासारख्या परिषदांनीं साध्य होणार आहे. संस्थानिकांच्या म्हणण्यास त्यांच्या प्रजेचा पाठिंबा आहे असें दिसून येतांच त्यांच्या म्हणण्याचें वजन वाढणार आहे. आज संस्थानिकांस संस्थानी मुलखाचे प्रतिनिधी म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु ते तसे प्रतिनिधी आहेत काय व या प्रतिनिधींच्या शब्दास काय मोल आहे याचा विचार व्हावयास पाहिजे. आतां परिस्थिति बदलेली आहे; तिच्याकडे डोळेझांक करून चालावयाचें नाहीं. परिस्थितीप्रमाणें बदल करण्यास आपण तयार आहों असें अशा परिषदांमार्फत प्रजाजनांनीं व या परिषदेच्या म्हणण्याप्रमाणें वागून संस्थानिकांनीं निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे. अशा वेळीं प्रत्यक्ष राज्यकारभार केलेले गृहस्थ परिषदेचे अध्यक्ष व्हावयास मिळावेत हें भावी यशाचें पूर्व सुचिन्हच आहे. सबब रावसाहेब बापट यांस अध्यक्षस्थानीं नियोजित करणें हें योग्यच आहे"

प्रो. कानिटकर यांनीं केलेल्या सूचनेस फलटणचे रा. रा. श्रीपाद माधव दाणी B. A. LL. B. वकील यांनीं योग्य शब्दांत अनुमोदन दिलें. "फलटण येथें ज्या प्रागतिक राजव्यवस्थेच्या द्योतक गोष्टी आज नजरेस येतात त्यांपैकीं. बऱ्याच अस्तित्वांत आणण्याचें श्रेय रावसाहेब बापट यांच्याकडे आहे. रावसाहेब बापट यांच्या राज्यकारभाराचें धोरण संस्थानिक व प्रजाजन या दोहोंच्या हिताच्या मिलाफाचें असें असे असा आजसुद्धां फलटणमध्यें त्यांचा लौकिक आहे. तेव्हां अशा गृहस्थासच आजच्या परिषदेचे अध्यक्ष करावें हें अगदीं योग्य आहे" असें त्यांनीं सांगितलें.

जमखंडीचे रा.रा. फडके वकील यांनीं अध्यक्षांच्या निवडणुकीस दुजोरा दिला. ते म्हणाले कीं "रावसाहेब बापट हे जमखंडीस बरेच दिवस कारभारी होते व तेथील त्यांच्या राजकारभाराचा अनुभव अगदीं ताजा आहे. तेथें त्यांनीं प्राथमिक शिक्षण मोफत करणें, म्युनिसिपालिट्यांमध्यें लोकनियुक्त सभासदांचा समावेश करणें वगैरे गोष्टी सुरू करण्याबद्दल श्रीमंतांस सल्ला देऊन त्या गोष्टी अंमलांत आणल्या. संस्थानिकांस योग्य सल्ला देण्याच्या धोरणामुळें संस्थानिकांच्या मनामध्यें त्यांच्याबद्दल सहजच आदर वसत असे, तेव्हां असा कर्णधार या परिषदेस लाभावा ही आनंदाचीच गोष्ट आहे."

जव्हारचे रा. रा. गंगाधर आण्णाजी दिमोटे यांनीं या ठरावास पुष्टि दिली. "रावसा. बापट यांची आपल्यास माहिती प्रत्यक्ष नाहीं. परंतु एका संस्थानांतून दुसऱ्या संस्थानांत त्यांस नेण्यांत आलें यावरून त्यांच्या राजकार्यकौशल्याची साक्ष पटणार आहे. तेव्हां असाच मार्गदर्शक आमच्या परिषदेस पाहिजे आहे" असें त्यानीं सांगितलें.

ही सूचना सर्वांनुमतें मंजूर झाल्यावर रा. सा. शंकर भालचंद्र बापट यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें.

## अध्यक्षांचें भाषण.

यानंतर परिषदेचे अध्यक्ष रा. सा. शंकरराव बापट यांचें पुढील आशयाचें भाषण झालें. आपणास अध्यक्षाच्या स्थानाचा मान दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानून ते आपल्या भाषणांत म्हणाले "मी संस्थानांत १५-२० वर्षें व ब्रिटिश हद्दींतही कांहीं वर्षें काम केलें आहे व माझा अनुभव मी तुम्हांस सांगेन. परंतु अशा प्रकारच्या सभा, परिषदा वगैरेंतून कामें करण्याचा

मला अनुभव नसल्यामुळें आपण सर्व मला मदत करून हें काम पार पाडाल अशी मला आशा आहे. पूर्वी या सार्वजनिक सभेच्या जागेंत सर्व वर्गांचीं माणसें जमून विचार करीत असत. संस्थानी प्रजाही येत असे. परंतु १८७८ सालापासून सर्व वातावरण बिघडलें. बुधवारवाडा जळाला व त्यानंतर लोकांत फाटाफूट झाली. त्यापूर्वी व पुढेंही कित्येक वर्षे संस्थानिक सार्वजनिक सभेचे अध्यक्ष उपाध्यक्ष वगैरेही असत. आज आपण जी परिषद् भरवीत आहोंत तशी परिषद् यापूर्वीच पुष्कळ वर्षे भरली नाहीं, याबद्दल मला वाईट वाटतें. पण असें होणें साहजिकच आहे. प्रतिनिधींच्या द्वारें राज्यकारभार चालवावयाचा ही लोकसत्तेची कल्पनाच आपल्या लोकांना नवीन आहे. पेशवाई गेल्यानंतर ७५ वर्षे गेलीं तेव्हां खालसा मुलुखांत लोकसत्तेची कल्पना हिंदी लोकांना येऊं लागली. वैदिक काळांत काय असेल तें असो, पण पौराणिक व ऐतिहासिक काळ पाहिला तर 'नाविष्णुः पृथ्वीपतिः' अशीच कल्पना रूढ असल्याचें दिसून येतें. आपण धर्मप्रधान लोक आहोंत. राजा, प्रजा वगैरेंचे धर्म सांगितले आहेत, परंतु प्रजेनें आपले प्रतिनिधि निवडून द्यावेत व त्यांनीं राज्यकारभार चालवावयाचा अशी व्यवस्था आपल्याकडे पूर्वी असल्याचें दिसून येत नाहीं. शिवाजी महाराजांनीं अष्टप्रधान नेमले, पण ते लोकांचे प्रतिनिधि म्हणून नव्हते. पूर्वी ग्रामपंचायती मात्र असत; पण फक्त न्यायमनसुबा देण्याचेंच काम त्यांचेकडे असे. लोकमतानुवर्ती राज्यकारभार चालणें ही कल्पनाच मुळीं पाश्चात्य आहे. आपल्याकडे अशोकासारखे राजे राज्य करीत असतां ग्रीसमध्यें व नंतर रोम येथेंही प्रजास्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लोकांनीं मोठा झगडा चालविला होता. लोकसत्तेची ही कल्पना आतां आपणही घेतली पाहिजे. रामचंद्र, धर्मराज वगैरेंसारखे पूर्वीचे राजे धर्मशील असत. पण आतां ती धर्मविषयक कल्पना राजांच्या मनांतून गेली आहे. सबब आतां सर्व सत्ता राजाच्या हातीं असणें इष्ट नाहीं.

संस्थानांतील राजे स्वतः सामान्यतः वाईट नसतात व मंत्री चांगला असला म्हणजे सर्व कांहीं चांगलें चालतें. परंतु इंग्रजींत ज्याला इंट्रीगर्स (Intriguers) म्हणतात, त्यांना मात्र मंत्र्यानें बाजूस सारलें पाहिजे. संस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्याचें काम फार नाजूक आहे व तें मुख्यतः संस्थानी प्रजेनेंच केलें पाहिजे. बाहेरच्या धंदेवाल्या चळवळ्यांनीं

(प्रोफेशनल ॲजिटेटर्सनीं) या कामीं ढवळाढवळ शक्य तितकी कमी करावी. या बाबतींत जहालपणा उपयोगी नाहीं. मी कै. न्यायमूर्ति रानडे यांचा शिष्य आहें व ते म्हणत असत त्याप्रमाणें हळूंहळूंच मार्ग काढला पाहिजे. आपली सुधारणा व्हावी अशाविषयीं संस्थानांतील प्रजेंत काय किंवा खालसा मुलखांतील प्रजेंत काय सारखीच उदासीनता दिसून येते. ती आधीं दूर केली पाहिजे व यासाठीं राष्ट्रीय सभेप्रमाणें या परिषदेचीं अधिवेशनेंही दर एक संस्थानांत भरवून लोकजागृति केली पाहिजे. आपणांस जें कांहीं मागावयाचें आहे व ज्या राज्यकारभाराविरुद्ध तक्रारी करावयाच्या आहेत त्या मुख्यत: संस्थानिकांच्याच कानावर घालाव्यात. ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे जाण्यांत अर्थ नाहीं असें मला वाटतें. क्वचित् प्रसंगीं जरूर पडेल तर संस्थानिकांचे परवानगीनें जावें. संस्थानांत सुधारणा घडवून आणण्याचें काम हळूं हळूं व रंगाझोंकानेंच केलें पाहिजे. 'आमचा सल्ला घ्या' अशी सौम्य मागणीच प्रथम करावी. अशा प्रकारें समजुतीनें व विचारानें घेतल्यास कदाचित् चारदोन वर्षांतही कांहीं संस्थानांतून या प्रश्नाचा बराच चांगला निकाल लागेल, अशी मला आशा आहे."

## परिषदेच्या कामासंबंधीं नियम.

अध्यक्षांचें वरीलप्रमाणें भाषण झाल्यावर रा. रा. केळकर यांनीं परिषदेचें काम चालविण्याचे बाबतींत तूर्तातूर्त ठरविण्यांत आलेले नियम वाचून दाखविले. परिषदेपुढें येणाऱ्या ठरावांवर मतें घेण्याचा प्रसंग आल्यास मतें देण्याचे बाबतींत कोणती पद्धति स्वीकारावी याबद्दल थोडासा वादविवाद झाला. ठरावांचा जो मसुदा वांटण्यांत आला होता त्याचा विचार करतां परिषदेंत मतें घेण्याचा प्रसंग येण्याचा संभव नसल्यानें त्याबद्दल नियम करण्याचें कारण नाहीं असाच वादविवादाचा निष्कर्ष निघाला.

सदर परिषद मुद्दाम खासगी स्वरूपाची केली असल्यामुळें या परिषदेंत होणाऱ्या वादविवादांतील तपशील कोणींही प्रसिद्ध करूं नये अशी रा. केळकर यांनीं विनंति केली. परिषदेच्या बैठकीची त्रोटक हकीगत सर्व वर्तमानपत्रांकडे व्यवस्थापकांकडून वेळच्यावेळीं रवाना करण्यांत येईल. या व्यवस्थेनें परिषदेस हजर असणारे गृहस्थांस आपले विचार स्पष्टपणें व मोकळ्या मनानें सर्वांपुढें मांडतां येतील. रा. रा. केळकर यांची सदरची सूचना सर्वांस मान्य झाली.

या परिषदेपुढें विवक्षित संस्थानांतील राज्यकारभारांतील गुणदोषांसंबंधानें वाटाघाट होऊन ठराव मंजूर व्हावयाचे नाहींत असें प्रथमपासूनच सुचविण्यांत आलें आहे व तेंच धोरण प्रस्तुतच्या परिषदेचें काम चालविण्याच्या वेळीं रहाणें इष्ट आहे अशी दुसरी एक सूचना रा. केळकर यांनीं परिषदेपुढें मांडली व ती परिषदेस मान्य झाली.

यानंतर परिषदेपुढें मांडण्याकरितां तयार केलेल्या ठरावांच्या मसुद्या-शिवाय अन्य कांहीं विषय मांडावयाचे असल्यास तसे मांडण्यांत यावे म्हणून अध्यक्षांनीं सूचना केल्यावर सांगलीचे रा.रा. ग. र. अभ्यंकर हे म्हणाले कीं, 'परिषदेनें आपल्या कार्याचें ध्येय प्रथम ठरवावें म्हणजे परिषदेसंबंधानें जो गैरसमज झाला असेल अथवा होण्याचा संभव असेल तो तावडतोब दूर होणार आहे.' यानंतर यासंबंधानें वाटाघाट होऊन पुढीलप्रमाणें आपलें ध्येय असल्याचें परिषदेनें एकमतानें ठरविलें.

' दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्या-खालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या परिषदेचें ध्येय आहे. '

( The Object of this Conference is the attainment of Responsible Government in Indian States in the Deccan, under the auspices of their respective Rulers, by all legitimate and peaceful means. )

यानंतर परिषदेचें कार्यक्षेत्र ठरवावें अशी सूचना आल्यावरून वाटा-घाटीनंतर या परिषदेच्या कार्याच्या कक्षेंत खालील संस्थानांचा समावेश करावा असें ठरलें.

" जव्हार, जंजिरा ( जाफराबाद तालुक्यासह ), सुरगणा, डांग संस्थानें, सावंतवाडी, सावनूर, कोल्हापूर, कोल्हापूर जहागिरी संस्थानें, औंध, भोर, फलटण, अक्कलकोट, जत, सांगली, मिरज, मिरजमळा, मुधोळ, जमखंडी, रामदुर्ग, कुरुंदवाड ( मोठी व लहान पाती )."

## कायमच्या कामाची तजवीज–संस्थास्थापना.

आज जी परिषद् बोलावण्यांत आली आहे त्या परिषदेमध्यें ठराव पास करूनच तिचें काम संपल्यासारखें होणार नाहीं. सदर परिषदेच्या उद्देशाचे सिद्धीकरितां सतत काम चालूं ठेवण्याची अत्यंत अवश्यकता आहे. सबब तें काम वर्षभर चालविण्याकरितां एक संस्था स्थापन करणें अवश्य आहे किंवा नाहीं याबद्दल प्रथम विचार व्हावा अशी सूचना पुढें आल्यावर तशी संस्था स्थापन करणें अवश्य आहे असें सर्वानुमतें ठरलें व अशा संस्थेची घटना व तिचे नियम यांचा मसुदा तयार करण्याकरितां खालीं नमूद केलेल्या गृहस्थांचें एक मंडळ नेमण्यांत आलें व त्यानें आपला मसुदा दुसरे दिवशींच्या सकाळचे बैठकीपुढें मांडावा असें ठरलें. त्याचप्रमाणें या मंडळास योग्य वाटतील त्या जादा गृहस्थांचा समावेश मंडळांत करून घेण्याचा अधिकार त्यास देण्यांत आला. या नवीन संस्थेचा उद्देश व तिचें कार्यक्षेत्र परिषदेनें जे आपल्या कार्यासंबंधीं ठरविले आहेत तेच असावेत असेंही ठरविण्यांत आलें.

### घटना व नियम मंडळ.

संस्थेची घटना व नियम यांचा मसुदा तयार करण्याकरितां नेमलेल्या मंडळांत खालील गृहस्थांचा समावेश केला होता.

(१) रावसाहेब शंकर भालचंद्र बापट (अध्यक्ष), (२) रा. न. चिं. केळकर, (३) रा. अ. वि. पटवर्धन, (४) रा. य. अ. ठोंबरे (पुणें), (५) रा. ग. आ. दिमोटे, (जव्हार), (६) रा. गो. म. रानडे वकील (मिरज), (७) रा. वा. ना. शहा (मिरज), (८) रा. के. रा. दिवेकर (भोर), (९) रा. श्री. मा. दाणी (फलटण), (१०) रा. ब. एम. जी. डोंगरे (पुणें), (११) रा. जी. एस. गोखले (कोल्हापूर), (१२) रा. पं. आ. इनामदार (औंध), (१३) रा. भा. ब. महाबळ (जमखंडी), (१४) रा. शं. अ. आपटे (जमखंडी), (१५) रा. वामनराव मिरजकर (मुधोळ), (१६) रा. ग. र. अभ्यंकर (सांगली), (१७) रा. के. रा. छापखाने (सांगली), १८ रा. अश्वत्थराव महिषी

( शिरहट्टी ), ( १९ ) रा. पां. वा. गाडगीळ ( कुरुंदवाड ), ( २० ) रा. सखाराम परशराम घैसास ( जंजिरा ), ( २१ ) रा. ज. स. करंदीकर ( पुणें ), ( २२ ) रा. वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी ( कोल्हापूर ).

परिषदेपुढें मांडण्याच्या ठरावांचा मसुदा तयार करून वांटण्यांत आला असल्यानें व या विषयांशिवाय अन्य विषय यंदांच्या परिषदेपुढें येण्याची अवश्यकता नसल्यानें 'विषयनियामक मंडळ' नेमण्याची जरूरी नाहीं असें सर्वांच्या मतानें ठरलें. यानंतर ठरावांचा विचार करण्याकरितां परिषदेची बैठक ता. २४।५।२१ रोजीं दुपारीं ३ वाजतां करावी अस सकाळची बैठक खलास झाल्याचें अध्यक्षांनीं जाहिर केलें.

---

## दुपारची बैठक.

### ता. २४ मे १९२१, दुपारीं ३ वाजतां.

पूर्वीं ठरल्याप्रमाणें दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेच्या दुपारचे बैठकीस ता. २४ मे १९२१ रोजीं दुपारीं ३-१५ वाजतां सुरुवात झाली. सभेच्या प्रारंभीं परिषदेच्या कामाबद्दल खालीं नमूद केलेल्या गृहस्थांकडून सहानुभूतिप्रदर्शक आलेल्या पत्रांपैकीं कित्येक पत्रांतील मजकूर रा. पटवर्धन यांनीं थोडक्यांत सांगितला.

रा. रा. लक्ष्मण जनार्दन आपटे वकील ( पुणें ), रावसा. त्रिंबक नारायण साठे ( दहिवडी ), मे. रा. नानासाहेब फराटे ( मांडवगण, फराटा ), रा. धोंडोपंत करमरकर ( मंगळवेढे ), रा. सखाराम मल्हार कुलकर्णी ( जांबुळपाडा, सं. भोर ), रा. नाना नरवणे ( मंगळवेढे ), रा. माधवराव देवल ( म्हैसाळ ), रा. व्ही. व्ही. आपटे ( कोल्हापूर ), रा. भीमराव आपटे ( जमखंडी ), रा. नारायण गणेश करमरकर ( जमखंडी ), रा. गोपाळ बळवंत गानू ( कुरुंदवाड ), रा. दामोधर मल्लापा लेंगडे ( शहापूर, सं. सांगली ), रा. चंडोपंत फडके ( सावळगी, सं. जमखंडी ), रा. महादेव कृष्ण कोनकर ( सिद्धेश्वर, सं. जंजिरा ), डॉ. हुल्याळकर ( जमखंडी ), रावसा. गोविंदराव मराठे ( अनगोळ, सं. कुरुंदवाड ), रा. गणेश अनंत लिमये ( जत ), केशव बळवंत जोशी ( श्रीवर्धन, सं. जंजिरा ), रा. एम्. एच्. बर्वे ( फलटण ), रा. दादासाहेब करंदीकर ( सातारा ), रा. विष्णुपंत

देशपांडे (तेरदाळ, सं. सांगली), रा. बा. सि. बामले (कराडोहो, सं.जव्हार), रा. गोपाळ कृष्ण देवधर ( पुणें ), रा. वाग्भट नारायण देशपांडे, वकील ( सातारा ), रा. माधवराव देशपांडे ( हुन्नर, सं. जमखंडी ), रा. आपासाहेब वाटवे, वकील ( जमखंडी ), रा. सदाशिवराव पेणसे वकील ( जमखंडी ), रा. माधवराव कुलकर्णी, वकील ( तासगांव ), मि. एस्. दुबे ( कानपूर ), मे. माधवरावसाहेब किबे ( इंदूर ), रा. केशव गणेश चांदवडेकर ( पाली, सं. भोर ), रा. माधव राजाराम सुभेदार ( शिरवळ, सं. भोर ), रा. विनायक यशवंत कुलकर्णी ( बोरली पंचतन, सं. जंजिरा ), रा. शिवराम अनंत केतकर ( पाली, सं. भोर ), रा. टी. ए. कुलकर्णी ( मुंबई ), शेट माणिकचंद रावजी दोशी ( फलटण ), रा. श्रीपाद अमृत राजोपाध्ये ( वार्सिबे ), रा. विनायक श्रीधर फाटक, वकील ( कुरुंदवाड ), रा. राजाराम दत्तात्रय आठवले (सांगली), रा. भिकाजी विष्णु मोनें (हिरडोशी सं. भोर), मे. यशवंत बाळकृष्ण लागू ( शिरहट्टी, सं. सांगली ).

नंतर परिशिष्ट ब मध्यें दिलेला ठरावांचा मसुदा प्रथम साद्यंत वाचून दाखविण्यांत आला. त्यापुढें एकेक ठराव चर्चेस घेण्यांत येऊन त्यावर वादविवाद होऊन खालील ठराव मंजूर करण्यांत आले.

## पास झालेले ठराव.

**ठराव नं. १—** हिंदुस्थानचे बादशहा व पार्लमेंट यांनीं हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें अंतिम ध्येय प्रजास्वातंत्र्य ऊर्फ स्वराज्य असल्याचें जाहीर केलें आहे. त्यास अनुसरूनच दक्षिणेंतील संस्थानिकांनींही आपापल्या संस्थानांसंबंधानें जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय जाहीर करावें अशी या परिषदेची त्यांना विनंति आहे.

**ठराव नं. २—**वरील ध्येय अमलांत येण्याकरितां संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानांत प्रातिनिधिक संस्था शक्य तितक्या लवकर निर्माण करून प्रजाजनांना राजकीय जबाबदारीचें शिक्षण देण्यास सुरुवात करावी अशी या परिषदेची त्यांना विनंति आहे.

**ठराव नं. ३—**प्रत्येक संस्थानांत प्रजाप्रतिनिधि सभा स्थापन करून तिची घटना खालसांतील कायदे कौन्सिलाच्या घटनेस सामान्यतः अनुसरून असावी.

ठराव नं. ४—(अ) संस्थानांत स्थापण्यांत येणाऱ्या प्रतिनिधिसभेस सर्व प्रकारचे कायदेकानू करण्याचा अधिकार देण्यांत यावा.

(आ) संस्थानांतून यापुढें जे कायदे नवीन अमलांत यावयाचे, त्यांस प्रतिनिधिसभेकडून मंजुरी घ्यावी; अशा मंजुरीशिवाय संस्थानिकांनीं केवळ आपल्या अखत्यारीनें बनविलेले किंवा केवळ खालसा मुलुखांत अंमलांत आहेत म्हणून मान्यता पावलेले कोणतेही कायदे यापुढें संस्थानांतून अंमलांत आणूं नयेत.

ठराव नं. ५—संस्थानांतील राज्यकर्त्यांनीं सालोसाल संस्थानच्या एकंदर जमाखर्चाचें अंदाजपत्रक प्रतिनिधिसभेपुढें ठेवावें व मामूल वहिवाटीस अनुसरून होणारा खासगी खात्याचा निव्वळ खर्च वगळून बाकी खात्यांच्या अंदाजपत्रकास प्रतिनिधिसभेची तपशीलवार मंजुरी घ्यावी.

ठराव नं. ६—आपल्या प्रजाजनांच्या नैसर्गिक हक्कांना, म्हणजे लेखन, मुद्रण, भाषण वगैरे व्यक्तिस्वातंत्र्याचे जे हक्क आहेत त्यांना व इतर व्यक्तिस्वातंत्र्याचे जे हक्क आहेत त्यांस विरोधी व प्रतिबंधक असणारे संस्थानांतील नियम, हुकूम अथवा कायदे रहित करण्यांत यावेत व यापुढें असले नियम वगैरे करणें झाल्यास ते स्थानिक लोकमत अजमावल्याखेरीज करण्यांत येऊं नयेत.

ठराव नं. ७—प्रत्येक संस्थानांत ग्रामपंचायती तावडतोब स्थापन करण्यांत याव्यात व त्यांजकडे सोंपविण्यांत येणारे अधिकार, त्यांनीं करणेचीं कामें व त्यांच्या खर्चास लागणारा पैसा यांची योजना करण्यांत यावी. सदर ग्रामपंचायतींना स्थानिक आरोग्य, शिक्षण, दुरुस्ती व सफाई व यांजबरोबरच गांवरखवाली व कांहीं अंशानें न्याय व मनसबी यांचेही अधिकार देण्यांत यावेत.

ठराव नं. ८—(अ) देशी संस्थानिकांना ब्रिटिश सरकारकडून आपले दोस्त असें मानण्यांत आलें आहे याबद्दल व 'फेडरेशन' च्या तत्वावर त्यांना हिंदुस्थानच्या कारभारांत अंशभागी करण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतु आहे त्याबद्दल या परिषदेस आनंद वाटतो. तथापि हा हेतु अंमलांत येण्यास संस्थानिकांची एक आणि संस्थानी प्रजेच्या प्रतिनिधींची एक अशा दोन सभा निर्माण करण्यांत याव्यात, अशी या परिषदेची ब्रिटिश सरकारास विनंति आहे.

( आ ) वरिष्ठ कायदे कौन्सिलांत, संस्थानांचा हितसंबंध येत असेल अशा प्रकारचे सर्व हिंदुस्थानास लागू होण्याचे कायदे मंजूर करून घेण्याचे प्रसंगीं वरील उभय सभांचे अभिप्राय मागविण्यांत यावेत.

**ठराव नं. ९**—दक्षिणेंतील संस्थानिकांपैकीं बऱ्याच संस्थानिकांचीं संस्थानें लहान व त्यांचें उत्पन्न थोडें आहे, तथापि त्यांजकडे स्वतंत्रपणें वहिवाटीस असणारे अधिकार महत्त्वाचे असतात. हे अधिकार चांगल्या तऱ्हेनें बजावले जाण्यास मोठ्या पगाराचे, सुशिक्षित व स्वतंत्र अधिकारी असणें इष्ट आहे. याकरितां निरनिराळ्या संस्थानांनीं गट करून समाईक खर्चानें असे अधिकारी नेमून त्यांजकडून असल्या अधिकारांचीं कामें, विशेषतः न्यायमनसुबीचीं कामें करवावीत.

**ठराव नं. १०**—खालसांतील प्रजा व संस्थानांतील प्रजा यांचेमध्यें मतदारीचे हक्क वगैरे बाबतींत जो भेदभाव मानण्यांत येतो तो मानण्यांत येऊं देऊं नये अशी या परिषदेची सरकार व संस्थानिक यांना विनंति आहे.

**ठराव नं ११**–(अ) संस्थानांतील प्रजेला उत्तेजन देण्याकरितां योग्य पगारावर शक्य तोंपर्यंत संस्थानांतील नोकऱ्यांवर विशेषतः अंमलदारांचे जागांवर संस्थानांतील लायख इसमांची नेमणूक करावी.

( आ ) ब्रिटिश मुलुखांत नोकरीची वयोमर्यादा, पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी वगैरे बाबतींत जे नियम अमलांत आहेत, त्यांचीच संस्थानांतूनही अंमलबजावणी करावी.

**ठराव नं. १२**—परिषदेंत पास झालेले ठराव संस्थानिक व ब्रिटिश सरकारचे अधिकारी यांच्याकडे पाठविणें व त्याबद्दल डेप्युटेशनमार्फत त्यांची गांठ घेणें वगैरेची सर्व व्यवस्था दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेनें यापुढें करावी.

परिषदेची ही बैठक ६ वाजेपर्यंत चालून परिषदेचें काम सतत चालाविण्याकरितां स्थापण्यांत यावयाच्या संस्थेची घटना व नियम यांच्या मसुद्याचा विचार करण्याकरितां परिषदेची बैठक ता. २५ मे १९२१ रोजीं सकाळीं ८ वाजतां भरावी असें ठरून परिषदेची दुपारची बैठक खलास झाली.

यानंतर परिषदेच्याच जागीं परिषदेचें काम सतत चालविण्याकरितां स्थापण्यांत यावयाच्या संस्थेची घटना व नियम यांचा मसुदा तयार करण्या-

करितां नेमण्यांत आलेल्या मंडळाची सभा झाली. रा. रा. पटवर्धन यांनीं तयार करून आणलेल्या मसुद्याची चर्चा होऊन 'घटना व नियम' यांचा मसुदा निश्चित करण्यांत आला.

---

## बैठक तिसरी.

ता. २५ मे १९२१ बुधवार, सकाळीं ८ वाजतां.

दक्षिणेंतील संस्थान प्रजापरिषदेच्या अधिवेशनांतील तिसरी बैठक ता. २५ मे १९२१ बुधवार रोजीं सकाळीं आठ वाजतां पुणें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत आदले दिवशींप्रमाणेंच सुरू झाली. अध्यक्ष रावसा. बापट स्थानापन्न झाल्यावर रा. पटवर्धन यांनीं 'घटना व नियम' तयार करण्याकरतां नेमलेल्या मंडळानें तयार केलेला मसुदा साद्यंत वाचून दाखविला. नंतर एकेक नियम वाचून त्यावर चर्चा होऊन त्यांत कमजास्त फेरफार सुचविण्यांत येतील त्यांचा खल होऊन अखेर स्वरूप कायम करण्यांत आलें. अखेर मंजूर झालेले नियम खालीलप्रमाणें आहेत. परिषदे मध्यें आश्रयदाते ( १०० रुपये एकदम देणारे ) व तहाहयात सभासद-(एकदम ५० रु. देणारे) हे दोन वर्ग सभासदांचे जास्त करावे असें ठरलें व सदर सभासदांचे वर्ग नियमांत दाखल करण्यांत आले.

### घटना व नियम.

१ नांवः—या संस्थेचें नांव दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा असें असावें.

२ ध्येयः—दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या संस्थेचें ध्येय आहे.

[ The object of this Conference is the attainment of Responsible Government in India States in the Deccan, under the auspices of their respective rulers, by all legitimate and peaceful means. ]

३ सभेच्या कार्याचें क्षेत्रः—या सभेच्या कार्याचा विस्तार खालील संस्थानांच्या विस्ताराबरहुकूम असावा.

१ जव्हार, २ जंजिरा (जाफाबाद तालुक्यासह), ३ सुरगणा, ४ डांग संस्थानें, ५ सावंतवाडी, ६ सावनूर, ७ कोल्हापूर, ८ कोल्हापूर जहागिरी संस्थानें, ९ औंध, १० भोर, ११ फलटण, १२ अक्कलकोट, १३ जत, १४ सांगली, १५ मिरज, १६ मिरजमळा, १७ मुधोळ, १८ जमखंडी, १९ रामदुर्ग, २० कुरुंदवाड, ( मोठी व लहान पाती. )

**४ कोणास सभासद होतां येईल ?**:—या सभेचे उद्देश व नियम मान्य असणाऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषास या सभेचे सभासद होतां येईल.

**५ सभासद होण्याच्या अटी**:—या सभेचे उद्देश मान्य असल्याबद्दल प्रत्येक सभासदानें लेखी मान्यता दिली पाहिजे; सदर सभासद वयानें १८ वर्षांहून कमी नसावा; सभासदानें सभेची ठरलेली वर्गणी सभेचें वर्ष सुरू झाल्यापासून चार महिन्यांचे आंत दिली पाहिजे; सदर सभासदाची वर्गणी, ती भरणेबद्दल ठरलेले मुदतीचे आंत न आल्यास, त्याचें नांव सभेच्या सभासदांच्या पटावर ठेवणें अगर न ठेवणें याबद्दलची तजवीज करण्याचा अधिकार या सभेचा कारभार करण्याकरतां नियम ९ प्रमाणें नेमण्यांत येणाऱ्या कार्यकारी मंडळाकडे आहे.

**६ सभासदांचे प्रकार**:—या सभेच्या सभासदांचे आश्रयदाते, तहाहयात सभासद व सभासद असे तीन वर्ग केले आहेत. एकदम १०० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **आश्रयदाते** म्हणावयाचें; एकदम ५० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **तहाहयात सभासद** म्हणावयाचें; सालदरसाल तीन रुपये सभेस वर्गणी देणारे गृहस्थास सभेचे **सभासद** म्हणावयाचें. या तिन्ही प्रकारच्या सभासदांच्या अधिकारांत मात्र कोणत्याही प्रकारचा भेदभाव असणेचा नाहीं.

**७ वर्षारंभ**:—या सभेच्या वर्षाचा आरंभ ता. ५ जूनपासून धरणेचा आहे.

**८ केंद्रस्थान**:—या सभेचें केंद्रस्थान पुणें शहर हें असावें व या सभेची कचेरी पुणें येथें असावी.

**९ कार्यकारी मंडळ**:—या सभेच्या कामाची व्यवस्था करण्याकरितां एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, दोन चिटणीस, एक खजीनदार व वीस साधारण सभासद अशा २५ गृहस्थांचें कार्यकारी मंडळ असावें.

१० **वार्षिक साधारण सभा**:—या सभेच्या सभासदांची वार्षिक सभा साल दरसाल मे अथवा जून महिन्यांत कार्यकारी मंडळान सोईच्या दिवशीं भरवावी. या सभेपुढें कार्यकारी मंडळानें वर्षाच्या कामाचा अहवाल व हिशोबाचा तक्ता मांडावा व ते मंजूर करून घ्यावेत. वार्षिक सभेत पुढील सालाकरतां नवीन कार्यकारी मंडळाची नेमणूक करावी. या वार्षिक सभेपुढें कार्यकारी मंडळास अथवा कोणा सभासदास जे जे प्रश्न वाटाघाटीस मांडावे असे वाटतील ते मांडण्यांत येऊन त्यांची चर्चा व्हावी.

११ **कार्यकारी मंडळाच्या सभा**:—कार्यकारी मंडळाची सभा पुणें येथें द१ २ महिन्यांनीं सोईप्रमाणें सेक्रेटरी यांनीं भरवावी. कार्यकारी मंडळाची सभा न भरवितां कामाचा निकाल सरक्युलरनें लावून घेणें सेक्रेटरीस सोईचें वाटल्यास तसें सेक्रेटरींनें करावें.

१२ **विशेष सभा**:—सभेच्या सभासदांपैकीं २० समासदांच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या ५ सभासदांच्या सह्यांनिशीं विशेष कामाकरितां सभेच्या सर्व सभासदांची विशेष साधारण सभा अथवा कार्यकारी मंडळाची सभा बोलवावी अशी सूचना आल्यास कार्यकारी मंडळाची सभा १० दिवसांत व सभेच्या सभासदांची विशेष साधारण सभा एक महिन्याचे आंत सेक्रेटरींनीं भरवावी.

१३ **कोरम**:—सभेच्या साधारण सभेचें कोरम २० असावें व कार्यकारी मंडळाच्या सभेचें कोरम ५ असावें.

१४ **देणग्या**:—या सभेच्या कार्याकरितां सभासद नाहींत अशांच्याकडूनही देणगीच्या रूपाची मदत घेण्यास हरकत नाहीं.

१५ **शाखा स्थापणें व संस्था जोडणें**:—सभेच्या शाखा संस्थानांतून स्थापण्याचा अथवा संस्थानांतून आज असलेल्या व पुढें आस्तित्वांत येणाऱ्या संस्था, सभेचें ध्येय, नियम व नियमन मान्य करीत असून सभेस जोडून घेण्याबद्दल त्यांचें मागणें आल्यास त्या तात्पुरत्या सभेस जोडून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास असावा व सदर कार्यकारी मंडळाचा ठराव सभेच्या साधारण सभेपुढें मांडून तो पास करून घ्यावा.

**१६ शाखा व संस्था यांचा संबंध तोडणें:**—सभेच्या शाखा अथवा सभेस जोडून घेतलेल्या संस्था यांचें काम कार्यकारी मंडळास मान्य नसल्यास त्या शाखा अथवा संस्था यांचा सभेशीं असलेला संबंध मंडळानें तात्पुरता तोडून टाकण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास असावा व याचा अखेरचा निर्णय करण्याचा अधिकार सभेच्या साधारण सभेकडे असावा.

**१७ सभासदास कमी करणें:**—सभेच्या सभासदांपैकीं कोणा सभासदास, सभासदांच्या पटांतून कमी करणें, सभेच्या हितानहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे असें कार्यकारी मंडळास वाटल्यास, कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं $\frac{2}{3}$ मतांनीं त्याचें नांव पटांतून कमी करणेचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

**१८ नियमांत कमजास्त करण्याचा अधिकार:**—या सभेच्या घटनेसंबंधानें जे नियम पास करण्यांत आले आहेत त्यांत पुढील परिषदेची बैठक होईपर्यंत कमजास्त करणें अवश्य होईल तर कार्यकारी मंडळाच्या $\frac{3}{4}$ सभासदांच्या मतानें सदर फेरफार मंजूर करून ते तात्पुरते अमलांत आणण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

यानंतर पास झालेल्या नियमांप्रमाणें चालू सालाकरितां कार्यकारी मंडळ नेमण्याचा प्रश्न परिषदेपुढें आला. यावेळीं रा. केळकर यांनीं सूचना दिली कीं, या कार्यकारी मंडळांत नांवें घालण्यापूर्वीं नांवें सुचविलेल्या गृहस्थांनीं आपण कार्यकारी मंडळांचे सभासद निवडल्यास आपण सदर मंडळाचे सभासद राहून काम करण्यास कबूल असल्याबद्दल स्वतः उठून सांगणें इष्ट आहे. या कार्यकारी मंडळाचे सभासद होणें म्हणजे मानाची एखादी जागा प्राप्त होणार आहे असें नसून सदर मंडळाचा सभासद होण्यानें सदर इसमास प्रसंगविशेषीं त्रासच होणार आहे, या गोष्टीचा विचार करून स्वतःची कबुली देणें इष्ट आहे.

सदर सूचनेचा विचार करून खालीं नमूद केलेल्या गृहस्थांनीं कबुली दिल्यावर त्यांचें कार्यकारी मंडळ पुढील सालाकरतां नेमण्यांत आलें.

## कार्यकारी मंडळ.

अध्यक्षः—रावसाहेब शंकर भालचंद्र बापट B. A. पेनशनर ( ढोलकर आळी, सदाशिव, पेठ पुणें ).

उपाध्यक्षः—रा. रा. केशव रामचंद्र छापखाने B. A. LL. B. वकील (सांगली).

सेक्रेटरीः—१ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर B. A. LL. B. संपादक केसरी ( केसरी ऑफिस, पुणें).

२ रा. रा. अनंत विनायक पटवर्धन B. A. मेंबर सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ( किबेवाडा, बुधवार, पेठ पुणें ).

सभासद—१ प्रो. के. रा. कानिटकर M. A., B. SC. ( फर्ग्युसन कॉलेज, पुणें ).

२ रा. ल. ब. भोपटकर M. A., LL. B. वकील ( सदाशिव पेठ, पुणें )

३ ,, ल. ज. आपटे B. A. LL. B. वकील (सदाशिव, पेठ पुणें).

४ ,, ग. र. अभ्यंकर B. A., LL. B. वकील ( सांगली ).

५ ,, गो. म. रानडे, वकील ( मिरज ).

६ ,, वा. य. वाटवे B. A., LL. B. वकील ( जमखंडी ).

७ ,, बलभीम मल्लिकार्जुन पाटणे (खंडाळी सं. मिरजमळा ).

८ ,, धोंडो अमृत शेट्ये ( भोर ).

९ ,, त्रिंबक रामचंद्र चमचे ( फलटण ).

१० ,, विष्णु बाबा अक्कलकोटकर सं.अक्कलकोट. ( ज्ञानकोश आफिस-शनवार पेठ पुणें ).

११ ,, पं. आ. इनामदार M. A. B. SC. ( औंध ).

१२ ,, हणमंत कृष्ण बालगांवकर सावकार व वकील (जत ).

१३ ,, गं. आ. दिमोटे वकील ( जव्हार ).

१४ ,, गजानन भिकाजी वैद्य ( श्रीवर्धन, सं. जंजिरा ).

१५ डॉ. गोपाळराव पळसुले ( आनंदाश्रम पुणें ).

१६ रा. वा. रा. कोठारी B. A. संपादक जागरूक ( जागरूक ऑफिस, कसबा पेठ पुणें ).

१७ ,, वासुदेव बाळकृष्ण कलकर्णी B. A., LL. B. वकील सं. कोल्हापूर. ( कसबा पेठ पुणें. )

१८ रा. ग. शं. गोखले संपादक वियाविलास ( कोल्हापूर )
१९ ,, म. चिं. जोग वकील ( इचलकरंजी ).
२० ,, मोरो बळवंत मराठे B. A., LL. B. वकील ( सं.कुरुंदवाड)
( बेळगांव )

रा. रा. अनंत विनायक पटवर्धन सेक्रेटरी यांनींच तूर्त खजिनदाराचें काम करावें असेंही ठरलें आहे.

याप्रमाणें पुढील सालाकरितां अधिकारी व कार्यकारी मंडळ यांच्या नेमणुका झाल्यावर रा. पटवर्धन यांनीं परिषदेच्या खर्चाकरतां सदर तारखेपर्यंत मदत किती मंडळीकडून किती आली व सदर परिषदेच्या खर्चाचा अंदाजी आंकडा किती होईल तो सांगितला. यानंतर रा. केळकर यांनीं जमलेल्या मंडळींनीं सभेचे सभासद होऊन व परिषदेच्या खर्चाकरितां देहणगी देऊन आरंभलेल्या या सत्कार्यास मदत करावी अशी विनंति केली. यानंतर परिषदेच्या खर्चाकरितां १६० रु.देहणगीच्यारूपानें जमा झाले व ७० गृहस्थ सभेचे सभासद झाले. सभेचे आश्रयदाते व तहाहयात सभासद होण्याचें कबूल करून खालील गृहस्थांनीं आपलीं नांवें दिलीं आहेत.

## १ आश्रयदाते.

१ डॉ. वा. ना. देसाई. ( सांगली )
२ रा. के. रा. छापखाने. ( ,, )
३ रा. ग. र. अभ्यंकर.( सांगली).
४ रा. वि. कृ. माईणकर. ( ,, ).

## २. तहाहयात सभासद.

१ रा. मुकुंद जिवन संख्ये (मु.बांधण,महाल मतवाडे सं.जव्हार).
२ ,, केशवराव वकील हैद्राबाद ( डेक्कन ).
३ ,, अश्वथराव माहिषी ( शिरहट्टी ).
४ रा. रा. शं. मंगसुळी ( शिरहट्टी ).
५ ,, वा. रा. कोठारी ( पुणें )
६ ,, वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी वकील (कोल्हापूर, पुणें)
७ ,, गोविंदराव रानडे ( मिरज ).
८ ,, मा. ब. महाबळ ( जमखंडी )
९ ,, पु. के. फडके ( ,, ).
१० ,, चिं. बा. वर्तक ( पाळी ).

यानंतर निरनिराळ्या संस्थानांपैकीं सांगली, जमखंडी, जंजिरा, भोर, येथील राज्यकारभारासंबंधानें तेथील गृहस्थांचीं गुणदोषवर्णनपर भाषणें झालीं.

शेवटीं उपसंहारादाखल भाषण करतांना अध्यक्ष म्हणाले कीं, "आज ज्या उत्साहानें कार्यास सुरुवात करण्यांत येत आहे त्याच उत्साहानें हें काम वर्षभर चालूं ठेवण्यांत येईल अशी मला फार उमेद आहे. आपण काम करावयाचें तें काळजीपूर्वक व व्यवस्थित रीतीनेंच केलें पाहिजे. अर्ज, विनंत्या करूनच आपण काम करीत रहावें म्हणजे आजना उद्यां आपणाला यश मिळाल्यावांचून राहणार नाहीं. कै. न्यायमूर्ति माधवराव रानडे यांनीं सांगितलेल्या धोरणानुसार आपण हळूं हळूं पण चिकाटीनें काम चालविलें पाहिजे; सत्याग्रह अगर अडवणुकीचे वगैरे मार्ग आपण उपयोगांत आणणें इष्ट नाहीं."

शेवटीं रावसाहेब बापट यांचे आभार मानण्याचा ठराव रा. कोठारी संपादक जागरूक ( पुणें ) यांनीं योग्य शब्दांत पुढें मांडला व त्यास रा. राजवाडे मालक चिंतामणी छापखाना ( सांगली ) यांनीं अनुमोदन दिल्यावर तो ठराव टाळ्यांच्या गजरांत पास झाला. शेवटीं सदर परिषद् घडवून आणणाऱ्या व्यवस्थापकद्वयाचे व सार्वजनिक सभेचा दिवाणखाना परिषदेस दिल्याबद्दल सभेचे आभार मानण्यांत आल्यावर परिषदेचें अधिवेशन खलास झालें.

# परिशिष्ट अ (१).

खाजगी

श्री.

किबेवाडा बुधवार पेठ, पुणें सिटी.

ता. १५।४।१९२१.

रा. रा.————————————————————

————————यांस

सा. न. वि. वि. संस्थानांतील राज्यव्यवस्था नवीन मन्वंतरास अनुसरून प्रजाहितपर व प्रजामततंत्री असणें अवश्यक आहे. त्यांत खालसा मुलुखांत, अंशतः कां होईना, परंतु राज्यव्यवस्थेचें धोरण नवीन कायद्यानें प्रजाप्रतिनिधितंत्री झालें आहे व या धोरणाचें ध्येय **प्रजाप्रतिनिधितंत्री स्वराज्य** साध्य करण्याचें बादशहांच्या निरोपाचे द्वारें जाहिर करण्यांत आलें आहे.

हिंदुस्थानांत खालसा व संस्थानी अशा दोन राज्यपद्धती आजवर चालू आहेत. यापूर्वी या देशांत सर्वच राज्यव्यवस्था नोकरशाहीमार्फत चालू असल्यामुळें खालसा प्रदेशामध्यें ज्या गोष्टी चालू करण्यांत येत त्या एका नाहीं दुसऱ्या तऱ्हेनें संस्थानांत अंमलांत आणण्यांत येत.आतां बदललेल्या परिस्थितींत ही स्थिति रहाणें शक्य नाहीं. संस्थानिक व नोकरशाही निरनिराळे दृष्टिकोणांनीं संस्थानांत पूर्वपीठिका चालू ठेवण्याची खटपट करतील. शेजारच्या मुलुखांत प्रागतिक राज्यपद्धति चालू असतां संस्थानी अंमलाखालीं निराळी पद्धति सुरू राहिल्यास तेथील प्रजेंत असंतोष वाढणें साहजिक आहे. या असंतोषाचा परिणाम खालसा मुलुखासही भोगावा लागेल.संस्थानिकांची वैयक्तिक राज्यपद्धति तहनामे वगैरेंनीं चालू ठेवूं देणें आपल्यास क्रमप्राप्त आहे असें सांगण्यांत येतें व त्या वेळींच बडे अधिकारी कालानुसार राज्यपद्धतींत बदल केला पाहिजे, असा उपदेश संस्थानिकांस करीत असतात.

परंतु या उपदेशाप्रमाणें, राज्यपद्धतींत बदल झाल्याचें क्वचितच दिसतें. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टांत संस्थानांत आपोआप फेरबदल घडून येईल असें नमूद केलें आहे. ब्रिटिश सरकारानीं निरनिराळ्या प्रश्नांवर संस्थानिकांचें मत

कळण्याकरितां प्रिन्सिज् चेंबर स्थापन केली आहे. अशा वेळीं संस्थानी प्रजेचें मत संस्थानी राज्यपद्धतीच्या सुधारणेबद्दल संघटित स्वरूपांत तयार होणें अत्यंत जरूर आहे.

हें मत काय असावें व त्याचा प्रसार कसा करावा याचा विचार करण्याकरितां येत्या मे महिन्याचे ता० १०।११ अथवा २४।२५ तारखेस पुणें मुक्कामीं निवडक मंडळीची सभा बोलावणें इष्ट वाटून हें पत्र आपल्यास सूचनार्थ पाठवीत आहों. ही परिषद् तूर्त कोल्हापूर, दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें, सातारा जहागिरींतील संस्थानें, सावनूर, जव्हार वगैरे संस्थानांतील निवडक गृहस्थ व संस्थानी प्रश्नासंबंधानें सहानुभूति बाळगणारी खालसा मुलुखांतील मंडळी यांची व्हावी अशी कल्पना आहे. या परिषदेंत कोणत्याही विविक्षित संस्थानांतील गैरव्यवस्थेच्या प्रश्नाची चर्चा व्हावयाची नसून संस्थानांच्याबद्दल सर्वसामान्य प्रश्नांसंबंधीं मत अजमावून तें सार्वत्रिक मान्य होण्याबद्दल काय खटपट करावी, हें ठरवावयाचें आहे.

या परिषदेस संस्थानिकांना प्रतिनिधी पाठविणेबद्दल सुद्धां आमंत्रणें करावींत व त्यांच्या सहकारितेनें सदर प्रश्नांचा निकाल लावण्याची खटपट करावी अशी एक सूचना आहे; या सूचनेबद्दल आपला अभिप्राय कळवावा.

या परिषदेनें संस्थानांच्या उत्पन्नांच्या मानानें संस्थानिकांच्या खासगी खर्चाची रक्कम ठरविणें, न्यायाचे व राज्यकारभारांतील तक्रारींचे बाबतींत संस्थानिकांस सल्ला देण्याकरितां पो.ए. वगैरे अधिकाऱ्यांच्या ऐवजीं हायकोर्ट जज्जाच्या लायखीच्या इसमांचें उघड चौकशी करणारें बोर्ड मागणें, संस्थानांत कायदे सुरू करण्यास मंडळें असावीं किंवा काय व तीं कशीं नेमावीं याचा विचार करणें, दूर दूर पसरलेल्या संस्थानी खेड्यांचा मोबदला खालसा व संस्थानी खेड्यांशीं करून मुलुख लसग्न होईल असें करणें, खालसा मुलुखांत पास होणारे कायद्यामुळें संस्थानी प्रजेवर बसणारे अप्रत्यक्ष करांचा अंश संस्थानांस मिळण्याबद्दल मागणी करणें, प्रिन्सिज् चेंबरच्या घटनेंत प्रजाप्रतीनिधींचा समावेश होईल असा घटनेंत बदल करविणें, जुने पुराणे तहांतील जाचक कलमें काढून टाकविण्याची खटपट करणें, ब्रिटिश मुलुखांतील कायदे मंडळ्यांनीं पास केलेल्या कायद्यांचा संस्थानी प्रजेवर परिणाम होतो, सबब असे कायदे पास होण्याचे वेळीं संस्थानी प्रजेचे प्रातिनिधी

कौन्सिलांत घेणें वगैरे प्रश्न घ्यावेत अशी सूचना आहे. या परिषदेपुढे हे किंवा अन्य दुसरे कोणते प्रश्न घ्यावेत व परिषदेस आपल्या संस्थानांतील कोणकोणत्या गृहस्थांस आमंत्रणें पाठवावींत याबद्दलच्या सूचना ता. २५।४।२१ पूर्वी कळविण्याची मेहेरबानगी करावी.

या परिषदेच्या पूर्वव्यवस्थेस थोडाबहुत खर्च लागणारच. तरी त्या खर्चाकरितां आपल्यास जी थोडीबहुत द्रव्यद्वारां मदत करणें असेल ती तावडतोब पाठविण्याची मेहेरबानगी करावी. यासंबंधाचा सर्व पत्रव्यवहार " रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें शहर, " यांचे नांवें करावा. या प्रश्नाची चर्चा होणें किती अवश्यक आहे तें जास्त कळविणेची जरूरी नाहीं. याची जरूरी आपणांस भासत आहेच. पत्रोत्तराची मेहेरबानी करावी. क. लो. वि.

नरसिंह चिंतामण केळकर,
संपादक केसरी, पुणें.

अनंत विनायक पटवर्धन,
मेंबर,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, पुणें.

ता. क.—आपल्या संस्थानांतील सर्व तालुक्यांचीं, पेट्यांचीं गांवें किंवा अन्य गांवें येथील सार्वजनिक प्रश्नांबद्दल आस्था असणारे गृहस्थांचीं नांवें पत्त्यासह कळविणेची मेहेरबानी जरूर करावी.

# परिशिष्ट अ (२).

खाजगी

श्री.

पुणें शहर.
बुधवार पेठ, किबे वाडा,
ता. १० मे १९२१.

वि. वि. दक्षिणेंतील संस्थानांतील प्रमुख गृहस्थ व खालसा मुलुखांतील संस्थानांबद्दल आस्था असणारे गृहस्थ यांची एक खासगी परिषद् पुणें येथें ता. २४।२५ माहे मे १९२१ रोजीं सकाळीं ७–११ व दुपारीं ३–६ यावेळीं (कामाप्रमाणें एक अगर दोन दिवस) सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत भरविण्याचें योजिलें आहे. सदर परिषदेमध्यें वाटाघाट करण्याच्या विषयांची यादी यालगत ठेविली आहे. यांतील विषय गाळणें किंवा याशिवाय नवीन विषय वाटाघाटीस घेणें हें जमलेल्या मंडळीच्या विचारावर अवलंबून रहाणार आहे. या परिषदेमध्यें विवक्षित संस्थानांतील अव्यवस्था किंवा अन्यायी राजपद्धति यांची वाटाघाट करणेची नाहीं, परंतु सामान्य विषयांच्या उद्घाटनार्थ विशेष उदाहरणें देण्यास हरकत नाहीं. आपण सभेस येण्याचे वेळीं आपल्यास माहिती असेल त्या अथवा संबंध असेल त्या संस्थानांचे ताजे एकदोन वर्षांचे वार्षिक रिपोर्ट–संस्थानांत रयतसभा वगैरे सारख्या संस्था असल्यास त्यांची घटना व प्रोसिडिंग, संस्थानी गॅझेटचे अंक, संस्थानचें क्षेत्रफळ व ताज्या खानेसुमारींतील गणतीचे आंकडे वगैरे माहिती घेऊन येणेची मेहेरबानगी करावी.

आपल्या माहितीच्या ज्या सद्गृहस्थांस आमंत्रणें पाठवून सभेस येणेबद्दल तसदी दिल्यानें सभेच्या कामास मदत होईल असें आपल्यास वाटत असेल त्यांचीं नांवें उलट टपालीं कळविण्याची मेहेरबानगी करावी. आम्हीं तीनशें-वर लोकांस पत्रें पाठविलीं आहेत. आमच्या यादींत आपल्याकडून येणारीं जीं नांवें नसतील त्यांना आमंत्रणें पाठविणेची ताबडतोब तजवीज करण्यांत येईल.

लगतच्या यादींत असलेल्या विषयांशिवाय निराळे कोणते जास्त विषय परिषदेपुढें यावेत अशी आपली इच्छा आहे तें कळविणेची मेहेरबानगी करावी. सदर विषय कळल्यावर त्यांचा समावेश कार्यक्रमांत करण्याची व्यवस्था करण्यांत यइल.

या परिषदेस प्रवेश फी वगैरे ठेविलेली नाहीं. परंतु तिच्या खर्चास मदत होणें अवश्य आहे. तशी आपल्यास हस्तें परहस्तें जी मदत करणें शक्य असेल ती सत्वर पाठविणेची मेहेरबानगी करावी. या परिषदेस येणारे मंडळींची रहाण्याची अथवा भोजनाची व्यवस्था कोणतीच केलेली नाहीं. कारण हें काम फार खर्चाचें व मनुष्यबळाचें आहे. हा प्रयत्न पहिलाच असल्यानें सर्वच तऱ्हेच्या जबाबदाऱ्या या खेपेस व्यवस्थापकांनीं आपल्या शिरावर घेणें इष्ट वाटलें नाहीं. सबब आपल्या येण्याची तारीख व पुण्याचा पत्ता कळवून ठेवावा म्हणजे कांहीं विशेष गोष्टी कळविण्याच्या झाल्यास त्या आपल्यास सदर पत्त्यावर कळविण्यांत येतील. पत्रोत्तराची मेहेरबानगी करावी. क. लो. वि.

न. चिं. केळकर.
अ. वि. पटवर्धन
व्यवस्थापक द. सं. म. परिषद, पुणें शहर.

ता. क.—लगत परिषदेच्या सभास्थानीं प्रवेश होण्यास अवश्य असणारें टिकीट व आपण परिषदेकरितां कोणत्या तारखेस येणार व पुणें येथें कोठें उतरणार हें उत्तरीं कळविणेकरितां लागणारें कार्ड हीं लगत ठेविलीं आहेत.

## परिशिष्ट (अ) ३.

खासगी                    श्री.

# दक्षिणी संस्थान प्रजापरिषद.

ता. २४।२५ माहे मे सन १९२१ इ.

सकाळीं ७–११ व दुपारीं ३–६

# चर्चेच्या विषयांची तात्पुर्ती यादी.

१ दक्षिणेंतील संस्थानी प्रजापरिषदेच्या पहिल्या बैठकीच्या वेळीं सभेच्या कामकाजाचे तात्पुरते नियम करणें.

१ बादशहा पंचम जॉर्ज यांनीं खालसा अमलाखालील मुलुखांत नवी राज्यपद्धति सुरूं करण्याचे वेळीं हिज़ रॉयल हायनेस दि ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्यामार्फत पाठविलेल्या संदेशाचे द्वारें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचें अंतिम ध्येय प्रजाप्रतिनिधितंत्री स्वराज्य असल्याचें जाहिर केलें आहे, याबद्दल आभार मानणें.

१ बादशाही सरकारनें पार्लमेंटचा कायदा करून संस्थानिक व संस्थानी प्रजाजन यांस खालसा मुलुखांतील कोणत्याही नोकरपेषांत किंवा प्रजाप्रतिनिधिपरिषदेंत शिरकाव करून घेण्याचा आजवर असलेला अडथळा काढून टाकल्याबद्दल बादशाही सरकारचे आभार मानणें.

१ खालसा व संस्थानी हिंदुस्थान हें बादशहांच्या सत्तेखालचेंच असल्यानें बादशहांनीं खालसा व संस्थानी हिंदुस्थानाचे प्रतिनिधी साम्राज्यपरिषद, तहपरिषद यांमध्यें नेमून हिंदुस्थानच्या दोन्ही भागांस एकच दर्जा दिला असल्यामुळें व खालसा व संस्थानी मुलुखाच्या सीमा एकमेकांत गुरफटलेल्या असल्यामुळें संस्थानी हिंदुस्थानाचें अंतिम ध्येय खालसा हिंदुस्थानाप्रमाणें प्रजाप्रतिनिधितंत्री स्वराज्य हेंच असणें अवश्य आहे व तें तसें जाहिर करण्याबद्दल बादशहा व संस्थानिक यांस विनंति करणें.

१ हिंदुस्थानची राज्यघटना स्वायत्त प्रांतिक सरकारें व संस्थानें यांच्या फेडरेशनच्या पद्धतीची होणार अशाबद्दल सन १९१० चा हिंदुस्थान सरकारचा खलिता, मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्ट व प्रिन्सिज् चेंबरची संस्थापना यावरून उघड होत आहे. तेव्हां अशा फेडरेशनचा घटक होण्याची पात्रता संस्थानी अंमलास येण्यास येथील सत्ता प्रजामततंत्री असणें अवश्य आहे, असें जाहिर करणें.

१ हिंदुस्थानांतील सर्व प्रजाजनांचा 'हिंदी प्रजाजन' असा एकच वर्ग करण्यांत येईपर्यंत खालसा मुलुखांत जे कायद्यांनीं व कानूंनीं हक्क प्रजाजनांस प्राप्त होतील त्यांचा फायदा संस्थानांत रहाणारे परंतु सदर कायदेकानूप्रमाणें पात्र असलेल्या व्यक्तींना मिळण्याबद्दल मागणी करणें. उदाहरणार्थ, युनिव्हर्सिटी कान्स्टिटच्यूअन्सीमध्यें संस्थानांतील पदवीधरांस मताचा हक्क ठेवणें.

१ हिंदी संस्थानांतर्फे हिंदुस्थानविषयक प्रश्नांबद्दल अभिप्राय कळावा म्हणून बादशहांनीं प्रिन्सिज चेंबर स्थापन केली आहे. परंतु या चेंबरची घटना सलामीच्या तोफांच्या संख्येवर मुख्यतः केली असल्यानें या चेंबरमध्यें संस्थानी प्रजेच्या प्रतिनिधींचाच काय परंतु लहानमोठ्या सर्व संस्थानिकांचा प्रत्यक्ष अथवा प्रतिनिधीमार्फत समावेश न झाल्यामुळें, या चेंबरच्या ठरावांस बंधकस्वरूप कसल्याच स्वरूपाचें नसल्यामुळें व सर्व संस्थानचे संस्थानिक व संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी यांना सभेस हजर रहाणेचें बंधन किंवा योजना केलेली नसल्यानें सदर चेंबर सर्वस्वी निरुपयोगी आहे. या चेंबरमध्यें लोकसंख्येच्या प्रमाणावर व्यक्तिशः संस्थानिक किंवा संस्थानिकांचे व संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी घेण्याची व्यवस्था करावी किंवा संस्थानिक व संस्थानिक प्रतिनिधी आणि संस्थानी प्रजाप्रतिनिधी यांच्या दोन निरनिराळ्या संस्था स्थापून त्यांच्या मार्फत हिंदुस्थानचा अभिप्राय सर्व राष्ट्रीय प्रश्नांसंबंधानें अजमावण्याची व्यवस्था करावी असें मागणें करणें.

१ संस्थानी प्रजेवर खालसा मुलुखांतील कायदे मंडळांत होणारे कायद्यामुळें अथवा खालसा मुलुखांतील सरकारच्या हुकुमामुळें सार्वत्रिक कर जे बसविण्यांत येतात त्यांच्या उत्पन्नांपैकीं अंश संस्थानास लोकसंख्येच्या प्रमाणांत मिळावा अशी मागणी करणें.

१ खालसा मुलुखांतील जे कायदे संस्थानी प्रजेस बंधक होतील ते पास होण्याचे वेळीं वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदे-मंडळांत संस्थानिक व संस्थानी प्रजा यांचे प्रतिनिधि योग्य प्रमाणांत घेणेची व्यवस्था करणेची योजना करणेबद्दल नेक नामदार व्हाइसराय यांस विनंति करणें.

१ संस्थानांत ब्रिटिश राज्यपद्धतींच्या मूलभूत तत्त्वांस विरोधी असलेले संस्थानांतील कायदे ताबडतोब रद्द करणेबद्दल संस्थानिकांस विनंति करणें व ते तसे रद्द झाले आहेत किंवा नाहीं याबद्दल चौकशी करून त्याप्रमाणें अंमलबजावणी करविण्याची तजवीज करणेबद्दल ने. ना. व्हाइसरॉयसाहेब व ने. ना. मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेब यांस विनंति करणें.

१ संस्थानांतील न्यायमनसुबा व राज्यकारभारांतील इतर बाबी यांसंबंधानें बादशाही सरकारचे प्रतिनिधी म्हणून रेसिडेंट, पोलिटिकल एजंट, ॲसिस्टंट पोलिटिकल एजंट यांच्याकडे जे अपीलअर्ज जातात त्याबद्दलचें उघड सुनावणी ऐकून सल्ला देण्याकरितां हायकोर्ट जज्जाचे लायकीचे इसमांचें एक बोर्ड नेमून त्यामार्फत संस्थानिकांस सल्ला देण्याची व्यवस्था करावी व पोलिटिकल खात्याकडे असलेलें तें काम यापुढें बंद व्हावें अशी विनंति ने. ना. व्हाइसरॉयसाहेब व ने. ना. मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेब यांस करणें.

१ संस्थानांत कोणते कायदे सुरू करणें, कोणते रद्द करणें व कोणत्यांत फेरबदल करणें यांची चर्चा करून सल्ला देण्याकरितां, संस्थानचे बजेटाची वाटाघाट करण्याकरितां व संस्थानच्या राज्यव्यवस्थेबद्दल विवादिक प्रश्नाबद्दल संस्थानिकांस सल्ला देण्याकरितां प्रत्येक संस्थानांत 'सल्लागार मंडळ' संस्थानिकांनीं अस्तित्वांत आणावें, अशी संस्थानिकांस विनंति करणें.

१ संस्थानिकांनीं खाजगी खर्चाकरितां, खाजगी उत्पन्नाचा विचार करून, संस्थानच्या उत्पन्नाचा अंश ठरवून घ्यावा व विशेष खर्चाकरितां जास्त रक्कम लागेल तेव्हां ती 'सल्लागार मंडळाच्या' सल्ल्यानुसार घ्यावी अशी त्यांस सूचना करणें.

१ संस्थानिकांनीं राज्यकारभाराचे सोईकरितां व राज्यकारभाराचा खर्च कमी करण्याकरितां संस्थानांचें फेडरेशन करणें, संस्थानी अधिकारी व नोकर यांची एक सर्व्हिस करणें, कित्येक खात्यांची व्यवस्था समाइकीनें

करणें, कित्येक संस्था सर्व संस्थानांनीं सहकार्यानें अंशतः खर्चाचा बोजा सोसून चालविणें, वगैरे प्रस्तुतच्या परिस्थितींत अवश्य झालें आहे; सबब याप्रमाणें संस्थानिकांनीं व्यवस्था करावी, अशी विनंति करणें.

१ संस्थानांत हायकोर्टाचे अधिकार चालविण्यास हायकोर्ट बेंच स्थापणें, संस्थानाच्या जमाखर्चाची तपासणी संस्थानाबाहेरच्या स्वतंत्र हिशोबतपासनिसाकडून करविणें, या अवश्यक सुधारणा ताबडतोब अंमलांत आणण्याबद्दल त्यांना विनंति करणें.

१ संस्थानिकांशीं ब्रिटिश सरकारचे जे तहनामे, करार वगैरे आजवर झाले असतील त्यांतील त्रासदायक अटी रद्द करण्याची व्यवस्था ब्रिटिश सरकार व संस्थानिक यांनीं, ब्रिटिश सरकार, संस्थानिक व संस्थानी प्रजाजन यांच्या प्रतिनिधींच्या कमिटीमार्फत चौकशी करून करावी, अशी विनंति ब्रिटिश अधिकारी व संस्थानिक यांस करणें.

१ संस्थानांतून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें, न्यायखातें व अंमलबजावणी यांची विभागणी करणें, संस्थानांतील स्थानिक धंद्यांची वाढ होईल अशी व्यवस्था करणें, म्युनिसिपालट्या, लोकलबोर्डें, ग्रामपंचायती यांसारख्या संस्था स्थापणें व त्यांची जोपासना करणें, पब्लिकवर्क्स खात्यावर व पोलिस खात्यावर जो खर्च होतो तो प्रजेच्या हितसंवर्धनाकडेच होईल अशी तजवीज करणें, देशी वैद्यकी पद्धतीचे दवाखाने जागजागीं स्थापणें वगैरे सुधारणा विवक्षित कालमर्यादेंत अमलांत आणणेबद्दल विनंति करणें.

१ सल्ला देणारे बोर्डाच्या निकालावर प्रिव्हीकौन्सिलकडे संस्थानी कज्ज्यांत अपिलें करण्याची व्यवस्था करावी अशी ब्रिटिश सरकारास विनंति करणें.

१ संस्थानें व संस्थानिक यांच्या विरुद्ध प्रजेच्या हक्काचे दावे संस्थानी कोर्टांत चालविण्याची व्यवस्था सर्व संस्थानांतून करण्याची व्यवस्था करणेबद्दल विनंति करणें.

१ संस्थानी कोर्टांतून व ऑफिसांतून न्यायमनसुब्याचीं व अन्य तऱ्हेचीं कामें निकाल न होतां अनेक वर्षें पडून रहातात व दिवाणी कोर्टामार्फत

निकालांत निघालेल्या कामांचा फिरून मुलुकी खात्यामार्फत फैसला करण्यांत येतो अशा बाबतींत सल्लागार मंडळांनीं पास केलेल्या कायद्यांनीं नियमन करण्याची व्यवस्था करण्याबद्दल संस्थानिकांस विनंति करणें.

१ या परिषदेंत पास होणारे ठराव नेक नामदार गव्हर्नरसाहेब, निरनिराळे संस्थानांचे पोलिटिकल आधिकारी व संस्थानिक यांचेकडे सादर करून सदरबद्दल त्यांच्याशीं पत्रव्यवहार करून संधी मिळाल्यास, चर्चा करण्याकरितां एक प्रतिनिधिमंडळ नेमणें.

१ संस्थानी प्रजापरिषदेचें काम सालदरसाल चालण्याकरितां व संस्थानी प्रजेस त्यांचे अडचणीचे वेळीं सल्ला व मदत देण्याकारितां एक कमिटी नेमणें.

१ संस्थानांनीं इंग्रज सरकारास लष्करी मदतीच्या मोबदला आजवर सालदरसालची मदत करण्याची किती जोखीम घेतली आहे किंवा एकदम मुलूख किंवा ऐवज दिला याबद्दलचे आंकडे ब्रिटिश सरकार व संस्थानिक यांनीं प्रसिद्ध करावे अशी विनंति करणें.

१ संस्थानी प्रजाजन यांस ब्रिटिश मुलुखांतील हत्यारांचें कायद्यानें फार प्रतिबंध होतो तसा न होण्याची व्यवस्था करणें व लष्करी शिक्षण, लष्करी कमिशनें व लष्कर उभारणी यांचे बाबतींत खालसा प्रजाजनांबरोबरीनें आधिकार असावेत अशी मागणी करणें.

## परिशिष्ट अ (४).

खाजगी

# दक्षिणी संस्थान प्रजापरिषद.

## ( पत्रद्वारें आलेल्या सूचना. )

१ हिंदुस्थानांत खालसा प्रजाजन व संस्थानी प्रजाजन असा जो भेद्भाव ठेवलेला आहे व त्यामुळें खालसा व संस्थानी प्रजेंत जो भेद्भाव करण्यांत येतो व संस्थानांचा दर्जा ज्यावरून ठरविण्यांत येतो तो भेद्भाव काढून टाकून ' हिंदी प्रजाजन ' असा एकच वर्ग, हिंदुस्थानाबाहेर जसा मानण्यांत येतो, तसाच हिंदुस्थानांत मानण्यांत यावा व त्याकरितां जरूर तर पार्लमेंटरी कायदा करावा, अशी बादशहांना विनंति करावी.

१ हिंदेतर प्रजाजनांचा न्यायमनसुबा करण्याचे बाबतींत, हिंदी संस्थानिकांच्या अधिकाराची जी नियंत्रणा केली आहे ती रंगानुरूप ठेवल्यानें अधिकारभेद व दर्जाची उच्चनीचता दाखविते, सबब सदर नियंत्रणा काढून टाकणेबद्दल मागणी करावी.

१ जकाती बसवून उत्पन्न वाढविणेच्या बाबतींत हिंदुस्थानास अधिकार किती आहेत हें ठरविण्याकरितां जें कमिशन नेमण्यांत येणार आहे त्या कमिशनवर संस्थानी प्रजाजन व संस्थानिक यांचे प्रतिनिधी नेमावेत व संस्थानिक व संस्थानी प्रजाजन यांस सदर कमिशनपुढें त्यांचें म्हणणें मांडणेबद्दल संधि देण्यांत यावी.

१ ज्याप्रमाणें हल्लीं राज्यकारभाराचे बाबतींत सल्ला घेण्याकरितां संस्थानिकांचें एक ' नरेंद्रमंडळ ' म्हणून स्थापिलें आहे. त्याप्रमाणेंच संस्थानिकांच्या प्रजेचा सल्ला घेण्यासाठीं व त्यांचे मतप्रदर्शनासाठीं Princes' People's Chamber म्हणून एक मंडळ स्थापण्यांत यावें व त्याचा संस्थानांना लागू असणाऱ्या प्रश्नांचे बाबतींत सल्ला घेतला जावा.

१ संस्थानमध्यें राज्यकारभार चालविण्यासाठीं म्हणून एक सभा स्थापण्यांत यावी. त्या सभेमध्यें संस्थानिकांनीं नेमलेले व संस्थानी प्रजेनें निव-

ढलेले असे सभासद असावेत व संस्थानचा राज्यकारभार या सभेच्या अनुमतीप्रमाणें चालविण्यांत यावा.

१ संस्थानांतील धर्मादाय—जात—इनाम—रयतमान्य वगैरे इनामें खालसा करण्याचेसंबंधीं विचाराकरितां एक इनाम कमिशन नेमण्यांत यावें व इनामें खालसा करण्याचा अधिकार सदर कमिशन व संस्थानिक यांचेकडे असावा.

१ कित्येक संस्थानांतून सभाबंदी करण्यांत आली आहे. तरी अशा रीतीनें सार्वजनिक हक्कावर गदा आणल्याबद्दल ह्या परिषदेनें निषेध प्रदर्शित करावा व असें सुचवावें कीं,जर कधीं सभाबंदीची जरूरी संस्थानिकांना भासूं लागली तर त्यांनीं आपल्या प्रजेच्या पुढाऱ्यांच्या पसंतीनें ती अमलांत आणावी.

१ संस्थानाच्या उत्पन्नांतून संस्थानिकांचे खाजगी खर्चाकरितां म्हणून एक ठराविक रक्कम त्यांना देण्यांत यावी व बाकीचा सर्व पैसा संस्थानांत लोकोपयोगी कार्याकरितां खर्च करण्यांत यावा. संस्थानाचा खर्च भागून जर कांहीं शिल्लक राहिली तर त्यावर संस्थानिकांचा कांहींही अधिकार असतां कामा नये.

१ मातृभूमीची उन्नति व भरभराट होण्यास सुशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. अशा सुशिक्षणाची सोय राष्ट्रीय शाळा काढून संस्थानांतून करण्यांत यावी.

१ निकट असलेल्या लहानमोठ्या संस्थानांचा गट करून त्या त्या संस्थानांतून कांहीं रक्कम बाजूला काढून औद्योगिक बाढीसाठीं समाईक भांडवलावर निरनिराळे उद्योगधंदे व कारखाने काढण्याचा उपक्रम करण्यांत यावा.

१ संस्थानिक व संस्थानी प्रजा यांमध्यें जागृति होऊन संस्थानाची राज्यव्यवस्था प्रजामतंत्री होण्याच्या दृष्टीनें कायमची चळवळ करण्याकरितां परिषदेनें एक कमिटी नेमावी व या कमिटीनें संस्थानांत जागृति राखण्याकरितां व निरनिराळ्या संस्थानांची एकमेकांना जरूर ती माहिती होण्याकरितां एक वर्तमानपत्र अगर नियतकालिक सुरू करावें व अन्य तऱ्हेनें ही संस्थानी राज्यसुधारणेची चळवळ कायम राखावी.

१ संस्थानी प्रजाजनांस लष्करी शिक्षण दण्याचे बाबतींत व त्यास-दारूगोळा किंवा हत्यारें पुरविण्याचे बाबतींत विश्वासाचें धोरण साम्राज्य-सरकारनें टेवावें.

१ संस्थानांत असलेले सैन्यास लष्करी शिक्षण देऊन तें कार्यक्षम होईल असें करावें.

१ गेल्या लढाईत संस्थानिकांनीं साम्राज्य–सरकारास जी मदत केली ती मुख्यतः संस्थानी प्रजाजन यांच्या मदतीनेंच केली असल्यामुळें संस्थानी प्रजाजन यांस राज्यकारभाराचे कामीं अधिकार देऊन त्यांचा दर्जा वाढविणें अवश्य आहे.

१ संस्थानिकांस संस्थानांकरितां खालसा मुलुखांत इस्टेटी घेण्यासाठीं धंद्यांतून भांडवल गुंतविण्याची सवलत ठेवावी.

१ संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानांतून औद्योगिक पहाणी करून धंद्याची वाढ करावी.

१ संस्थानांचें फेडरेशन होईपर्यंत निदान संस्थानी खेड्यांच्या परस्पर मोबदला लोकांच्या संमतीनें करून राज्यकारभाराचा खर्च कमी होईल असें करावें.

१ संस्थानांशीं झालेल्या तहनाम्याविरुद्ध अनधिकार नात्यानें जे प्रकार राज्यव्यवस्थेच्या बाबतींत अमलांत येतात ती पद्धत बंद करून संस्थानच्या लोकसभेच्या संमतीनें नवीन प्रचार अमलांत यावेत.

१ संस्थानांतील प्रजाजनांवर साम्राज्य–सरकारनें लष्करी खर्चाचा बोजा त्यांच्या संमतीवांचून जास्त वाढवूं नये.

१ निरनिराळ्या संस्थानी कोर्टांतून निरनिराळे कायदे लागू करण्यांत येतात. इंग्रजी कायदे, इंग्रजी कायद्यांची थोड्याबहुत फेरफारानें भाषांतरें करून तयार केलेले कायदे व क्वचित् नवे कायदे कोर्टांतून उपयोगांत आणले जातात. कोठें तर मुळींच कायदे नाहींत. सर्व राज्यकारभार राजाज्ञेवर व वटहुकुमावर चालविला जातो. ही स्थिति सुधारण्याकरितां ब्रिटिश मुलुखाप्रमाणें सर्व संस्थानांतूनही कायद्यांचे बाबतींत एक सार्वत्रिक व्यवस्था करण्यांत यावी व या तयार केलेल्या सार्वत्रिक कायद्यांचें एक पुस्तक

संस्थानिकांनीं प्रसिद्ध करावें अशी या परिषदेची सर्व संस्थानिकांना विनंति आहे.

१ ब्रिटिश दिवाणी कायद्याप्रमाणें संस्थानांतही राजावर व सरकारी अधिकाऱ्यावर फिर्याद करण्याचा अधिकार संस्थानी प्रजेस मिळावयास पाहिजे. हे प्रजेचे दावे चालविण्याकरितां ब्रिटिश डिस्ट्रिक्ट जज्जाच्या दर्जाच्या स्वतंत्र न्यायाधीशाची नेमणूक करण्यांत यावी. त्याचप्रमाणें संस्थाना संस्थानांच्या दरम्यानचे दावेही याच स्वतंत्र न्यायाधीशापुढें मांडण्यांत यावेत. हल्लीं हे दावे चालविण्याकरितां जी अति खर्चाची कमिशनें नेमण्याची वहिवाट आहे ती बंद करण्याबद्दल व वरील स्वतंत्र न्यायाधीशाची नेमणूक करण्याबद्दल ह्या परिषदेची सर्व संस्थानिकांना विनंति आहे.

१ संस्थानिकांनीं संस्थानचे शिलकेंतून परमुलुखांत ज्या इस्टेटी खरेदी केल्या असतील त्यांचे मालकीचा हक्क संस्थानाकडे यावा व या इस्टेटीसंबंधानें व्यवस्थेचा सर्व अधिकार संस्थानांवर सोंपवावा, अशी या परिषदेची सर्व संस्थानिकांना विनंति आहे.

१ संस्थानांतील ब्यांका, कंपन्या व कारखाने यांत ब्रिटिश हद्दींतील लोकांचे पैसे असल्यास त्यांना आपल्या पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें आपल्या पैशाचे व्यवहाराचे बाबतींत ब्रिटिश कोर्टाकडेही न्याय मागण्याची मुभा असावी. आपल्या संस्थानांतील उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीकरितां संस्थानिकांनीं ही मुभा त्यांना द्यावी व आपल्या संस्थानांची संपत्ति वृद्धिंगत करावी, अशी या परिषदेची सर्व संस्थानिकांना विनंति आहे.

## परिशिष्ट ब.

# दक्षिणेंतील संस्थान प्रजापरिषदेपुढें मांडण्याच्या ठरावांचा मसुदा.

**ठराव नं० १:**—हिंदुस्थानचे बादशहा व पार्लमेंट यांनीं हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें अंतिम ध्येय प्रजास्वातंत्र्य ऊर्फ 'स्वराज्य' असल्याचें जाहीर केलें आहे. त्याला अनुसरून देशी संस्थानिकांनीही स्वराज्याचें ध्येय जाहीर करावें.

**ठराव नं० २:**—स्वराज्याचें अंतिम ध्येय अंमलांत येण्याकरितां संस्थानिकांनीं आपल्या राज्यांत प्रातिनिधिक संस्था शक्य तितक्या लवकर निर्माण करून स्वतःला व प्रजाजनांना जबाबदारीचें शिक्षण देण्यास सुरुवात करावी.

**ठराव नं० ३:**—खालसा मुलखांत प्रातिनिधिक संस्था यापूर्वी बरेच दिवस निर्माण झालेल्या असल्या तरी, संस्थानांतून राज्यकारभारांतील वरिष्ठ दर्जाच्या जागा संस्थानी प्रजेस मिळत असल्याकारणानें सामान्यतः राज्यकारभार करण्याची पात्रता संस्थानी प्रजेंत पूर्वीचीच आहे, व प्रातिनिधिक संस्था निर्माण झाल्यास त्याही यशस्वी करण्याची पात्रता खालसांतील प्रजेहून संस्थानी प्रजेंत कमी नाहीं.

**ठराव नं. ४:**—ज्या संस्थानांतून प्रजाजनांच्या नैसर्गिक हक्कांना प्रतिबंधक असे कायदे हल्लीं अंमलांत असतील त्यांतून ते सर्व रद्द करण्यांत यावे; आणि लेखन, भाषण, सभा वगैरे मतस्वातंत्र्य व्यक्त करण्याचे जे प्रसिद्ध प्रकार आहेत, त्यांस बाध येईल अशा प्रकारचे कायदे अगर नियम प्रजेच्या संमतीशिवाय यापुढें करण्यांत येऊं नयेत.

**ठराव नं० ५:**—संस्थानांतील राज्यकर्त्यांनीं सालोसाल संस्थानांच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक मुख्य रयतसभेपुढें ठेवून मंजूर करून घ्यावें. विशेषतः संस्थानिकांचा खासगी व दरबारखर्च आणि प्रजेवर होणारा सार्वजनिक खर्च, यांचे उल्लेख स्वतंत्र करून मंजुरी घ्यावी.

ठराव नं० ६:—संस्थानांतून यापुढें जे कायदे नवीन अमलांत याव-याचे त्यांस मुख्य रयतसभेकडून मंजुरी घ्यावी. अशा मंजुरीशिवाय संस्था-निकांनीं केवळ आपल्या अखत्यारीनें बनविलेले, किंवा केवळ खालसा मुलखांत अमलांत आहेत म्हणून मान्यता पावलेले कोणतेही कायदे यापुढें अमलांत आणूं नयेत.

ठराव नं० ७:—ज्या संस्थानांतून हल्लीं प्रातिनिधिक सभा नाहींत अशा संस्थानांतून नवीन सभा निर्माण होणें त्या, संस्थानिकांनीं खालसांतील कायदे कौन्सिलांच्या घटनेस सामान्यतः अनुसरून बनवाव्या.

ठराव नं० ८:—जीं संस्थानें लहान असल्यामुळें कायदे कौन्सिला-सारख्या प्रातिनिधिक संस्था तेथें निर्माण करणें अवघड असेल तेथें निदान एखादें मध्यवर्ती सल्लागार मंडळ तरी अवश्य निर्माण करण्यांत यावें.

ठराव नं० ९:—कोणत्याही संस्थानांत, मग तेथें कायदे कौन्सिल असो अगर सल्लागारमंडळ असो, जुन्या पद्धतीवर ग्रामपंचायती तावडतोब निर्माण करण्यांत याव्या व त्यांजकडे सोंपविण्यांत येणारे अधिकार, कामें व खर्चास लागणारा वसूल यांची वांटणी तावडतोब करण्यांत यावी. सदर ग्रामपंचायतींनास्थानिक आरोग्य, शिक्षण, दुरुस्ती, सफाई यांबरोबरच गांवरखवाली व कांहीं अंशानें न्याय व मुन्सफी यांचेही अधिकार देण्यांत यावे.

ठराव नं० १०:—देशी संस्थानिकांना ब्रिटिश सरकारकडून आपले दोस्त असें मानण्यांत येऊन 'फेडरेशनच्या तत्त्वावर त्यांना हिंदुस्थानच्या कारभारांत अंशभागी करण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतु आहे. याबद्दल ही सभा उभय सरकारांचें अभिनंदन करते. तथापि हे हेतु अमलांत येण्यास खास संस्थानिकांची अशी एक, आणि संस्थानिक प्रजेच्या प्रतिनिधींची अशी एक, मिळून दोन सभा निर्माण होऊन, त्यांच्या द्वारें, संस्थानिक व संस्थानी प्रजा यांचें हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं मत घेण्याचा परि-पाठ सुरू व्हावा.

ठराव नं० ११:—हल्लीं अस्तित्वांत आलेल्या नरेंद्रमंडळाची रचना समाधानकारक नसल्यानें ती दुरुस्त व्हावी. तसेंच या सभेचें काम जाहीर

रीतीनें चालावें व तिच्या ठरावांस कांहीं मर्यादेंत कां होईना, पण निर्णायक व ब्रिटिश सरकारावर बंधनकारक अशा प्रकारचें स्वरूप शक्य तितक्या लवकर देण्यांत यावें.

**ठराव नं० १२:**—वरिष्ठ कायदे कौन्सिलांत संस्थानांसुद्धां सर्व हिंदुस्थानास लागू होण्यासारखे कायदे मंजूर व्हावयाचे असतां त्यांवर ठराव नं० १० यांत सांगितलेल्या दोन सभांचे अभिप्राय देण्यांत यावे.

**ठराव नं० १३:**—हिंदुस्थान सरकार जकाती वगैरे कित्येक बाबतींत जो कर वसूल करितें त्यांपैकीं किती अंश संस्थानिकांना मिळणें योग्य आहे व याचा मोबदला म्हणून संस्थानिकांनीं सर्व हिंदुस्थानाला उपयोगी अशा बाबींच्या खर्चांतील किती अंश सोसावा याचा उभय सरकारांनीं कमिशन नेमून विचार करावा.

**ठराव नं० १४:**—दाक्षिणेंतील संस्थानिकांपैकीं बऱ्याच संस्थानिकांचीं संस्थानें लहान व त्यांचें उत्पन्न थोडें आहे तथापि त्यांजकडे स्वतंत्रपणें वहिवाटीस असणारे अधिकार महत्त्वाचे असतात, व हे अधिकार चांगल्या तऱ्हेनें बजावले जाण्यास मोठ्या पगाराचे सुशिक्षित व स्वतंत्र अधिकारी असणं इष्ट आहे, याकरितां निरनिराळया संस्थानांनीं आपापल्या सोयीप्रमाणें गट करून व समाईक खर्चानें असे अधिकारी नेमून त्यांजकडून असल्या अधिकारांचीं कामें, विशेषतः न्यायमुनसफीचीं कामें करवावीं.

**ठराव नं० १५:**—खालसांतील प्रजा व संस्थानांतील प्रजा यांतील भेदभाव यापुढें शक्य तितका कमी करण्यांत येत जावा. म्हणजे अधिकारांच्या जागांवर नेमणूक होणें, मतदारांचे हक्क मिळणें वगैरे बाबतींत खालसा मुलखांत अगर संस्थानांत असणारे परस्परांचे प्रजाजन हे परस्परांकडून वेगळे मानण्यांत येऊं नयेत, व सर्वांना ते हक्क समान लाभावे अशी व्यवस्था शक्य तितकी करण्यांत यावी.

---

## परिशिष्ट क.

# दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा.

### सभासद होऊं इच्छिणाऱ्या इसमानें भरण्याचें

# मान्यतापत्रक.

रा. रा. अध्यक्षसाहेब, दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा यांसीः—

वि. वि. मी खालीं सही/निशाण करणार दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेचा सभासद होऊं इच्छितों. मीं सभेचे नियम समजावून घेतले आहेत. सभेचे उद्देश, ध्येय, नियम व नियमन मला मान्य आहेत व त्याप्रमाणें मी वागण्यास तयार आहें. माझेसंबंधाची माहिती याखालीं लिहिली आहे ती बरोबर आहे.

तारीख सही/निशाणी ______________________

१ संपूर्ण नांव ______________________

२ संपूर्ण पत्ता ______________________

३ मूळ ठिकाण ______________________

४ संस्थानांतील अथवा खालसांतील ______________________

५ वय ______________________

६ जात व धर्म ______________________

७ धंदा ______________________

८ पदवी किंवा हुद्दा ______________________

९ शिक्षण योग्यता ______________________

१० सभासदांपैकीं प्रकार ______________________

# सभासदांच्या माहितीकरितां अवश्य असणारे कांहीं नियम.

१ **नांवः**—या संस्थेचें नांव **दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा** असें असावें.

२ **ध्येयः**—दक्षिणेंतील हिंदी संस्थानांत त्या त्या संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं जबाबदार राज्यपद्धति शांततेच्या व योग्य मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें या संस्थेचें ध्येय आहे.

३ **सभेच्या कार्याचें क्षेत्रः**—या सभेच्या कार्याचा विस्तार खालील संस्थानांच्या विस्ताराबरहुकूम असावा.

१ जव्हार, २ जंजिरा (जाफराबाद तालुक्यासह), ३ सुरगणा, ४ डांग संस्थानें, ५ सावंतवाडी, ६ सावनूर, ७ कोल्हापूर, ८ कोल्हापूर जहागिरी संस्थानें, ९ औंध, १० भोर, ११ फलटण, १२ अक्कलकोट, १३ जत, १४ सांगली, १५ मिरज, १६ मिरजमळा, १७ मुधोळ, १८ जमखंडी, १९ रामदुर्ग, २० कुरुंदवाड, ( मोठी व लहान पाती. )

४ **कोणास सभासद होतां येईल ?**—या सभेचे उद्देश व नियम मान्य असणाऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषास या सभेचे सभासद होतां येईल.

५ **सभासद होण्याच्या अटीः**—या सभेचे उद्देश मान्य असल्या बद्दल प्रत्येक सभासदानें लेखी मान्यता दिली पाहिजे; सदर सभासद वयानें १८ वर्षांहून कमी नसावा; सभासदानें सभेची ठरलेली वर्गणी सभेचें वर्ष सुरू झाल्यापासून चार महिन्यांचे आंत दिली पाहिजे; सदर सभासदाची वर्गणी, ती भरणेबद्दल ठरलेले मुदतीचे आंत न आल्यास, त्याचें नांव सभेच्या सभासदांच्या पटावर ठेवणें अगर न ठेवणें याबद्दलची तजवीज करण्याचा अधिकार या सभेचा कारभार करण्याकरितां नियम ९ प्रमाणें नेमण्यांत येणाऱ्या कार्यकारी मंडळाकडे आहे.

६ **सभासदांचे प्रकारः**—या सभेच्या सभासदांचे आश्रयदाते, तहाहयात सभासद व सभासद असे तीन वर्ग केले आहेत. एकदम १०० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **आश्रयदाते** म्हणावयाचें; एकदम ५० रुपये देणारे गृहस्थास सभेचे **तहाहयात सभासद** म्हणावयाचें; साल दरसाल तीन रुपये सभस वर्गणी देणारे गृहस्थास सभेचे **सभासद** म्हणावयाचें. या तिन्ही प्रकारच्या सभासदांच्या अधिकारांत मात्र कोणत्याही प्रकारचा भेदभाव असणेचा नाहीं.

१७ **सभासदास कमी करणें**:—सभेच्या सभासदांपैकीं कोणा सभासदास, सभासदांच्या पटांतून कमी करणें, सभेच्या हितानहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे असें कार्यकारी मंडळास वाटल्यास, कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं $\frac{3}{4}$ मतांनीं त्याचें नांव पटांतून कमी करणेचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

" I confidently look to Your Highness to maintain the advance, since it has been your Highness' constant endeavour to secure the happiness and contentment of your people. It may be that, in the pursuit of this endeavour and in *consonance with the spirit of the time*, you may decide to place your system of Government upon a broader basis, with a view to associating your subjects, both Hindu and Mahamedan, more closely with the administration."

*H. E. Lord Chelmsford at Jammu Darbar.*
*5th March 1921.*

* * *

" I have all along my career, as ruler of this State, been alive to the fact that its sovereignty did not postulate an autocratic and irresponsible governance of its affairs, but, on the contrary imposed upon me the sacred duty of treating it as a trust, to the administered with due regard to the dictates of justice, equity and good conscience. I have accordingly always taken the keenest interest in directing the government of the State along the paths of progress. Nothing has never been dearer to me than promoting the welfare of my State and my people according to the advancing needs of the times and I have spared no personal comforts and convenience to further it on the lines of approved principles of public polity. Taking, however, the organisation of the administration as a whole, I hope the reforms will serve to convey to Your Excellency an earnest of the good will which inspires me in my dealings with the affairs of the State and to indicate with sufficient clearness the constitutional development made by the administration. *

* * * * *

" The recent introduction of reforms in the Government of British India which owe themselves to the collaboration of Your Excellency and the Right Hon'ble Mr, Montagu and for which the future generations of the country will ever cherish your memory with feelings of intense gratitude,

furnish a forcible illustration of this proposition. *The trend of territories under the direct control of the British Government must necessarily effect a change in the angle of vision of the peoples inhabiting the Indian States.* As ruler of Jammu–Kashmir State I welcome the change. I have never given my countenance to any autocratic dealings with my subjects and I have always tried my best to accord due consideration to all matters affecting their well-being. I view the future with hope and confidence and I am accordingly considering the question of introducing certain reforms in the State with due regard to the stage of evolution it has now reached and its present needs. I hope to be able to make an announcement in this connection, and I am sure the measures taken will, in their practical application, be fruitful in promoting the public good and in affording better opportunities for the associatiou of my subjects in the government of the State."

*H. H. the Maharaja of Jammu and Kashmir in his reply*
*5th March 1921.*